कृषीवल

रायगड ॥ सोमवार, दिनांक १३ जून २०२२

किंमत ४ ₹

शारलोट तलावात पाणीसाठा वाढणार

पान ८ वर

जिल्ह्यात कोरोनाचे १२८ नवे रूग्ण

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात गेल्या २४ तासात तब्बल ८ तालुक्यात १२८ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. सुदैवाने उपचारादरम्यान एकाही रुग्णाचा मृत्यू झालेला नाही. दिवसभरात ३० रुग्ण कोरोनामुक्त झाले असून तब्बल ५३१ क्टीव रुग्णांवर उपचार सुरू असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. रविवारी जिल्ह्यातील पनवेल मनपा क्षेत्रात ७५, पनवेल ग्रामीण ३५, उरण ४, खालापूर २, कर्जत ४, पेण ४, अलिबाग १, माणगाव २, आणि श्रीवर्धन १ असे १२८ रुग्ण आढळले. तर पनवेल ग्रामीण २७, खालापूर ३, अशा एकूण ३० रुग्णांना बरे वाटल्याने कोरोना मुक्त घोषित करण्यात आले आहे.

जय भवानी, जय शिवाजी पुन्हा एकदा जयघोष

तिथीनुसार शिवराज्याभिषेक दिन

जुनेद तांबोळी

। महाड ।

श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव समिती, कोकण कडा मित्र मंडळ आणि रायगड जिल्हा परिषद यांच्यावतीने रविवारी किल्ले रायगडावर तिथीनुसार शिवराज्याभिषेक दिन सोहळा आयोजित करण्यात आला होता. जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषांनी अवघा दुर्गराज दणाणून गेला.

या सोहळ्याला खा.डॉ. श्रीकांत शिंदे, खा. श्रीरंग बारणे, आ. भरत गोगावले, आ. महेंद्र थोरवे, माजी आ. मनोहर भोईर, विहिंपचे क्षेत्रीय मंत्री शंकर गायकर, शिव प्रतिष्ठान युवा संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष नितीन चौगुले, बजरंग दलाचे संदीप भगत, इतिहास अभ्यासक पांडूरंग बलकावडे, शिवव्याख्याते सौरभ करडे, चित्रपट दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, युवा सेना जिल्हा अधिकारी विकास गोगावले, कोकणकडा मित्रमंडळाचे अध्यक्ष सुरेश पवार, नितीन पावले, श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती,

दुर्गराज रायगडचे अध्यक्ष सुनील पवार आदि मान्यवर उपस्थित होते.

ध्वजपूजन, ध्वजारोहण झाल्यानंतर मुख्य शिवराज्याभिषेक सोहळ्याला प्रारंभ झाला. त्यानंतर उपस्थिती असलेले दोन दाम्पत्य जोडीच्या तसेच सर्वच मान्यवरांच्या हस्ते श्री. छत्रपती शिवरायांच्या मूर्तीवर दुग्धाभिषेक आणि जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर खा. डॉ. श्रीकांत शिंदे, खा. बारणे, आ. गोगवले, आ. थोरवे यांच्या हस्ते शिवरायांच्या मूर्तीवर सुवर्ण नाण्यांचा अभिषेक करण्यात आला.

या नंतर आपले मनोगत व्यक्त करताना खा. श्रीकांत शिंदे यांनी पुढील वर्षी ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा भव्य दिव्य स्वरुपात साजरा करण्यात येईल, अशी घोषणा केली.

आ. गोगावले यांनी आषाढी, कार्तिकीला जेवढे पुण्य पंढरपूरच्या पांडूरंगाच्या दर्शनाने मिळते. तेवढेच पूण्य रायगडवर येऊन मिळते असे यावेळेस सांगितले. राजसदर ते जगदिश्वर मंदिर अशी शिवप्रतिमेची पालखी मिरवणूक झाल्यानंतर या सोहळ्याची सांगता झाली. सुमारे पन्नास हजार शिवभक्त यावेळेस गडावर उपस्थित होते. पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

भाजपला सत्तेपासून दूर ठेवा : काँग्रेस

। जेएनपीटी । प्रतिनिधी ।

पुरोगामीचा, समतेचा आणि जो राज्यघटनेचा विचार आहे ज्यांनी आपल्याला हक्क दिले. ज्यांनी आपल्याला राजकारणात स्थान दिले. ही जी राज्यघटना आहे, ती जर वाचवायची असेल तर भारतीय जनता पक्षाला सत्तेपासून दूर ठेवल्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असे रोखठोक प्रतिपादन महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी रविवारी उलवे येथे केले.

काँग्रेसच्या ओबीसी सेल मंथन मेळाव्यात ते बोलत होते. सोनिया गांधी यांना सक्तवसूली संचालनालयाची (ईडी) नोटीस देऊन छळ करत आहात असा आरोपही त्यांनी केला.

ओबीसीच्या जनतेला काँग्रेसनेच न्याय दिला आहे. तो हिरावून घेण्याचे काम भाजपा सरकारने केले आहे. ओबीसीवर अन्याय करण्याचे काम या भाजपने केले आहे. आज हेच सरकार काँग्रेस पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी व राहुल गांधी यांना ईडीची नोटीस बजावत आहे. परंतु आमच्या नेत्यांना कोणी हात लावणार असेल तर काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता कदापि ते सहन करणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

– नाना पटोले, प्रदेशाध्यक्ष

हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. तुमच्या-आमच्या हक्कांवर गदा येण्याची शक्यता आहे. सोनिया गांधी, राहुल गांधी आपल्याकरिता काम करतात. त्यांना आता ईडीच्या नोटिसा आल्या आहेत. ईडीच्या नोटिसा सोनिया गांधींना. •> पान २ वर

पंकजा समर्थकांनी दरेकरांना अडविले

। बीड । वृत्तसंस्था ।

भारतीय जनता पक्षाने विधान परिषदेची उमेदवारी पंकजा मुंडे यांना न दिल्याने त्यांच्या समर्थकांनी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांचा ताफा बीड जिल्ह्यातील पारगाव येथे अडवण्याचा प्रयत्न समर्थकांनी केला आहे. यावेळी त्यांनी प्रवीण दरेकर यांच्याविरोधात घोषणा दिल्या.

डोलवी एमआयडीसीबाबत आज बैठक

। मुंबई । प्रतिनिधी ।

डोलवी एमआयडीसी संदर्भात शेतकऱ्यांचा वाढता विरोध लक्षात घेवून सोमवारी, दि. १३ जून सकाळी १० वा. प्रांत कार्यालय पेण येथे शेतकरी अणि प्रशासन यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

याबैठकीलाशेकापसरचिटणीस आ. जयंत पाटील, आ.रवी पाटील, माजी आम.धैर्यशील पाटील यांच्यासह शेतकरी उपस्थित राहणार आहे. प्रांत विठ्ठल इनामदार यांच्या उपस्थितीत होणाऱ्या बैठकीत यावर चर्चा होणार आहे.

दरम्यान, या परिसरात होणाऱ्या एमआयडीसीला शेतकऱ्यांनी यापूर्वीच विरोध दर्शविलेला आहे.आम.जयंत पाटील यांनीही विधीमंडळ अधिवेशनात एमआयडीसी उभारताना आधी शेतकऱ्यांना विश्वासात घ्या, त्यांना जमिनीचा ५० टक्के मोबदला दिला जावा अशी मागणी केलेली आहे. त्याला उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनीही होकार दर्शविलेला आहे. असे असतानाही प्रशासनाने मात्र शेतकऱ्यांना मोजणीच्या नोटिसा पाठविल्याने शेतकऱ्यांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण झालेला आहे. मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागलेले आहे.

मोसमी पाऊस मराठवाड्याकडे

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईसह दक्षिण कोकणातील काही जिल्ह्यांत मान्सूनचं आगमन झालं आहे. काल दिवसभरात मुंबई, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात अनेक ठिकाणी पावसाच्या सरी कोसळल्या आहे. आज मान्सूनच्या रेषेत कोणताही बदल झाला नाही. मात्र, मान्सूनच्या पुढील प्रवासासाठी महाराष्ट्रासह आसपासच्या प्रदेशात पोषक हवामान तयार झालं आहे. येत्या चोवीस तासात मराठवाड्यात मान्सून दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ के एस होसाळीकर यांनी याबाबत ट्वीट केलं आहे.

त्यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटलं की, आज मान्सून रेषेत कोणताही बदल झाला नाही. पण उत्तर अरबी समुद्र, कोकणातील उर्वरित भाग, गुजरातमधील काही भाग, मध्य महाराष्ट्रातील बहुतांशी भाग, कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल आणि बंगालचा उपसागर परिसरात मान्सूनच्या प्रवासासाठी पोषक हवामान तयार झालं आहे. मराठवाड्यात देखील मान्सूनच्या आगमनासाठी पोषक हवामान तयार झालं आहे. येत्या चोवीस तासात याठिकाणी मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रपतीपदासाठी विरोधकांची व्यूहरचना

बुधवारी नवी दिल्लीत बैठक

। मुंबई । प्रतिनिधी ।

राष्ट्रपती पदासाठीच्या निवडणुकीसाठी विरोधकांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. येत्या १५ जून रोजी विरोधकांची दिल्ली येथे बैठक होणार आहे. या बैठकीसाठी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पुढाकार घेतला असून, त्यांनी बिगर भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री तसेच २२ विरोधी पक्षाच्या नेत्यांना बैठकीसाठी आमंत्रित केलं आहे.

या बैठकीत

निवडणुकीसाठीच्या आगामी रणनीतीवर चर्चा करण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रपती पदासाठीच्या निवडणुकीसाठी विरोधकांकडून कोण उमेदवार असेल यावरदेखील या निवडणुकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. •> पान २ वर

राज्यसभेत भाजप पारडे जड

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

विविध राज्यांत झालेल्या राज्यसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्ष २४ पैकी २० जागाच राखेल, असा अंदाज वर्तविण्यात आला होता. प्रत्यक्षात मात्र भाजपने २२ जागा जिंकल्या आणि अनेक ठिकाणी अपक्षांचा विजय सोपा केला. विरोधी गटांतील आमदारांची आणि अपक्षांची मते मिळवण्यातही भाजप विजयी ठरल्यामुळे आगामी राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी भाजप आणखी बळकट झाल्याचे मानले जात आहे.

राज्यसभा विजयाने भाजपसोबत राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात 'एनडीए'लाही बूस्ट मिळाल्याचे बोलले जाते. महाराष्ट्र, कर्नाटक आणि हरियाणामध्ये पक्षाने आखलेली रणनीती प्रत्यक्षात उतरली आणि भाजपच्या उमेदवारांचा विजय साकारला. अपक्षांना पाठिंबा देऊन किंवा प्रतिस्पर्ध्यांच्या गोटात फूट पाडून स्वत:च्या उमेदवारांना फायदा मिळवून देण्यात भाजप यशस्वी ठरला. राजस्थान वगळता इतर सर्व राज्यांमध्ये प्रत्येकी एक अतिरिक्त जागा भाजपच्या पदरात पडली.

राहुल गांधींची आज ईडी चौकशी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात राहुल गांधींची सोमवारी १३ जूनला ईडी चौकशी करणार आहे.यापूर्वी २ जून रोजी चौकशीसाठी त्यांना बोलावले होते. त्यावेळी राहुल गांधी भारतात नव्हते, अशा परिस्थितीत त्यांनी ईडीकडे नवीन तारीख मागितली होती.

दरम्यान, काँग्रेसच्या अंतरिम अध्यक्षा सोनिया गांधी यांना आज कोविड संबंधित त्रासामुळे गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.

सोनिया गांधी यांना अलिकडच्या काळातच कोरोनाची लागण झाली होती. तेव्हापासून हळूहळू त्यांच्या आरोग्यात सुधारणा होत होती, मात्र प्रकृती खालावल्याने त्यांना आज सर गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पैशांच्या देवघेवीवरुन महिलेचा खून

आरोपीला २४ तासात अटक

। खोपोली । वार्ताहर ।

कोळशाच्या भट्टीवर कामावर येण्यासाठी दिलेल्या पैशांच्या देवघेवीवरुन एका महिलेचा खून करण्याचा प्रकार उघडकीस आला असून, खालापूर पोलिसांनी याप्रकरणी आरोपीला २४ तासात अटक केली आहे. आशा वाघमारे, रा.उंबरे आदिवासीवाडी, खालापूर असे मृत महिलेचे नाव आहे.

खालापूर तालुक्यातील रानसईच्या बोरीची मळशी या जंगल भागात कुजलेल्या अवस्थेत एक महिलेचा मृतदेह सापडला

होता. त्याचा शोध करणे खालापूर पोलीसांसमोर मोठे आव्हान होते. पण पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांच्या टीमने तपास करीत अवघ्या २४ तासात आरोपीला अटक करण्यात यश मिळविले आहे.

प्रथमदर्शनी हा मृतदेह पंधरा,वीस दिवसांपूवी असावा असा अंदाज बांधण्यात आला. कारण त्या महिलेच्या अंगावर साडी नव्हती व तिची कवटी धडापासून वेगळी झाली होती आणि त्या प्रेताचे मास काही ठिकाणी हिंस्र प्राण्यांनी खाल्लेले दिसत होते. प्रेताच्या पायात पैंजण डाव्या हाताच्या बोटात अंगठी व हातापायाच्या बोटांना नेलपेंट लावलेली होती. चेहरा दिसत नव्हता. मृत महिलेचे फोटो आजूबाजूच्या गावात व आदिवासी वाड्यांमध्ये दाखवण्यात आले पण कोणताही सुगावा अथवा धागेदोरे हाती लागत नव्हते.

तपासात खालापूर तालुक्यातील उंबरे येथे राहणारे काळूराम मारुती वाघमारे आपल्या •> पान २ वर

पनवेल : डोनेशन घेणाऱ्या शाळांची चौकशी

रायगड शिक्षणधिकाऱ्यांची चौकशी समिती गठीत

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील खाजगी शाळा पालकांकडून डोनेशन घेवून लुट करीत असल्याच्या तक्रारीची दाखल घेवून प्रहार जनशक्ती पक्षाने शिक्षण अधिकारी यांच्याकडे निवेदन देवून या शाळांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत या सर्वावर लक्ष ठेवण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (देणगी प्रतिबंध) कायदा १९८७ अंतर्गत बालकांच्या सक्तीच्या शिक्षणाच्या हक्काचा कायदा असून पनवेल तालुक्यातील अनेक खाजगी शाळांकडून या कायद्याची पायमल्ली होत असल्याची तक्रारही प्रहार जनशक्ती पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष संतोष गवस यांनी रायगड जिल्हा प्राथमिक व माध्यमिकचे शिक्षण अधिकारी यांच्याकडे केली होती. पनवेल तालुक्यातील खाजगी शाळांकडून डोनेशन घेण्याची प्रक्रिया मोठ्याप्रमाणात आढळून आल्याचे लक्षात घेवून रायगड जिल्हा शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी या शाळांची चौकशी करून डोनेशन घेणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याचे ठरवले आहे. यासाठी आठ सदस्यांची समिती स्थापन केली असून शाळांचे दप्तर तपासण्यात येणार असल्याचे पत्रकात म्हटले आहे. सदर चौकशीत दोषी आढळून आलेल्या शाळांवर कठोर कारवाई करावी डोनेशन घेतलेले पैसे परत करावेत त्याच प्रमाणे डोनेशन घेतले आहे त्यांनी संपर्क करण्याचे आवाहन संतोष गवस यांनी केले आहे.

कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण

कै. शालिनी जयराम पाटील

कै. नारायण नागु पाटील यांची सुकन्या कै. शालिनी जयराम पाटील (कृषीवलची पहिली स्त्री संपादिका) यांची आज १०१ वी जयंती त्या निमित्त त्यांचे पूण्यस्मरण

त्यांची पतवंडे कु. तनिश व प्रतोष, नृपाल घरत यांनी केले असून लक्ष्मी शालिनी विद्यालय पेझारी या कोकण एज्युकेशन सोसायटी अलिबाग या शाळेला कायम स्वरुपी २,४०,००० रु. ठेव दिली आहे. या रक्कमेतील व्याजातून दरवर्षी प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बक्षिस दिले जाते.

कुडाच्या घरांचा आदिवासींना आधार

धम्मशील सावंत

। पाली/बेणसे ।

खऱ्या अर्थाने निसर्गात राहुन निसर्गाचे संवर्धन करणारे आदिवासी लोक नैसर्गिक संसाधनांचा वापर केलेल्या कुडाच्या घरात राहत आहेत. पावसाळ्यात आपला निवारा टिकविण्यासाठी हे आदिवासी आपल्या कच्च्या कुडाच्या घरांची डागडुजी व नव्याने बांधणी पूर्ण करतात. जिल्ह्यातील विविध आदिवासी वाड्यापाड्यांवर आता ही कुडाची घरे बनून तयार झाली आहेत. तर काही फार्म हाऊस व कृषीपर्यटन केंद्रावर देखील अशा प्रकारची कुडाची घरे बनवली आहेत. ही घरे पर्यटकांना देखील आकृष्ट करतात.

कुडाचे घर बांधण्यासाठी सर्वात महत्वाची साधनसामग्री म्हणजे कारवीच्या काठ्या, माती व शेण जंगलातून कारवीच्या लांब काठ्या तोडून आणल्या जातात. मग दगडी व मातीच्या पायावर कारवीच्या काठ्या उभ्या करुन बांधल्या जातात. त्यावर मातीचा आणि शेणाचा मुलामा दिला जातो. बहुतांश वेळा घरातील आदिवासी महिलाच हे काम करतात. या कामासाठी •> पान २ वर

जंगलात कारवी सहज उपलब्ध आहे. सध्या पावसाळा सुरु झाल्याने अनेक जण आपली कुडाच्या घरांची डागडूजी करत आहे. हे कुडाचे घर अनेक वर्ष टिकते. मात्र ऊन, वारा, पाणी यामुळे कालांतराने ते कुजते. आणि पुन्हा नव्याने त्याची डागडुजी करावी लागते. आता अनेक लोक विटांच्या कच्च्या घरात राहत आहेत. परंतू तरीही काहींना गरिबीमुळे कुडांच्या घरांशिवाय पर्याय नाही.

– एकनाथ जाधव, साजे आदिवासी वाडी

नैसर्गिक संसाधनांचा बांधकामांसाठी वापर

घरकुलाचा लाभ नाही

गरीब, उपेक्षित, वंचित व गरजवंतांच्या डोक्यावर छत असावे म्हणजेच त्यांना हक्काचे घर मिळावे यासाठी विविध घरकुल योजना शासनाकडून राबविल्या जातात. मात्र या घरकुल योजनांचा लाभ प्रत्यक्षात किती गरजवंतांपर्यंत पोहचतो हा संशोधनाचा मुद्दा आहे. असे अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद दिल्ली संलग्नचे कोकण संघटक रमेश पवार यांनी सांगितले.

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ जून

१) श्री. विलास द. नाईक
१३-६-१९५२
चोरोंडे-मापगाव, अलिबाग

म ह त्त्वा चे

मनसेतर्फे विद्यार्थी सेना बळकटीकरण

। कर्जत । प्रतिनिधी ।

विद्यार्थी सेना बळकटीकारणासाठी मनसेने कोकण संवाद दौरा सुरू केला आहे. या दौऱ्यास कर्जत तालुक्यातून सुरुवात करण्यात आली. यश सरदेसाई आणि प्रशांत कानोजिया हे दूत म्हणून काम पाहत आहेत. कार्यक्रमाला मनसेचे रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील, जिल्हा साचीव जे.पी. पाटील, तालुका अध्यक्ष महेंद्र निगुडकर, विद्यार्थी सेना सचिव प्रसन्न बनसोडे, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष संदेश ठाकूर, उत्तर रायगड जिल्हा महिला अध्यक्ष अदिती सोनार, आकांक्षा शर्मा सावंत, हेमंत ठाणगे, अक्षय महाले, समीर चव्हाण, सचिन कर्णुक उपस्थित होते. श्री छत्रपतींच्या रायगडातून हा संवाद दौरा सुरू केला असल्याचे यावेळी कानोजिया यांनी म्हटले आहे.

खडसेंचा सेनानेत्यांना सल्ला

। डोंबिवली । प्रतिनिधी ।

राज्यसभा निवडणुकीतील मतदानावरुन अपक्षांवर अशा प्रकारे अविश्वास दाखवणे योग्य नाही असा मोलाचा सल्ला राष्ट्रवादी नेते एकनाथ खडसे यांनी शिवसेना नेते संजय राऊत यांना देऊ केला आहे. राज्यसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर शिवसेना नेते संजय राऊत यांनी पराभवाच खापर अपक्ष आमदारांवर फोडले आहे.

पनवेल -सायन महामार्ग एलईडीने उजळणार

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

पनवेल-सायन महामार्गावरील बेलापूर ते कळंबोली यादरम्यानचे पथदिवे अनेक महिन्यांपासून बंद आहेत. येथील पिवळे म्हणजेच सोडियमचे दिवे बदलून त्या जागी एलईडी लावण्यात येणार आहेत. ही यंत्रणा पनवेल महापालिका हस्तांतरित करून घेणार असून पथदिवे आणि विद्युतीकरणाचे नूतनीकरण करणार आहे. यासाठी जवळपास १० कोटी पाच लाखांचा खर्च अपेक्षित असून सर्वसाधारण सभेसमोर याबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे. विषयसूचीमध्ये त्याचा समावेश करण्यात आल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली.

पनवेल-सायन महामार्गाचे विस्तारित काँक्रिटीकरण करण्यात आले असून याकरिता बाराशे कोटी रुपये खर्च करण्यात आला. महामार्गावर

पथदिव्यांसह इतर सुविधाही देण्यात आल्या आहेत. छोट्या वाहनांना टोलमधून सूट दिल्यामुळे त्याबदल्यात पनवेल टोल वेज कंपनीला पैसे न दिल्याने संबंधित एजन्सी बाहेर पडली. त्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागले आहे.

पनवेल-सायन महामार्गावरील पथदिवे देखभाल व दुरुस्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावेत, असे आदेश सरकारने दिल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नवी मुंबईबरोबरच पनवेल पालिकेकडे पत्रव्यवहार करून पथदिवे वर्ग करण्याचे सूचित केले होते. त्यानुसार भारती विद्यापीठ ते कळंबोली जंक्शन यादरम्यानचे पथदिवे देखभालीची जबाबदारी आता पनवेल महापालिकेकडे देण्यात आली आहे. यासंदर्भात शेतकरी कामगार पक्षाचे कामोठे शहर अध्यक्ष अमोल शितोळे यांनी पाठपुरावा केला. सामाजिक कार्यकर्त्या रंजना सडोलीकर यांनीही पत्रव्यवहार केला होता. अंधारामुळे दररोज पनवेल-सायन महामार्गावर अंधारामुळे लहान-मोठे अपघात घडत आहेत. काळोखाचा फायदा घेत कळंबोली, कामोठे बस थांब्यावर चोऱ्यांचे प्रकारही घडले आहेत.

पनवेल महापालिकेने पथदिवे हस्तांतरित करून घेऊन नूतनीकरणाचा आराखडा तयार केला आहे. तो सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठवण्यात आला आहे. २० जून रोजी होणाऱ्या पनवेल महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत हा विषय पत्रिकेमध्ये आणण्यात आला आहे. यावर चर्चा होऊन ठराव संमत केला जाणार आहे. त्यामुळे लवकरच पनवेल सायन-महामार्गावर प्रकाशमय होण्याची शक्यता आहे.

सव्वा नऊशे एलईडी बसवणार

पनवेल-सायन महामार्गाचे नूतनीकरण करताना २६७ पथदीप म्हणजेच खांब उभारण्यात आले होते. त्यावर सोडियमचे ९१८ दिवे बसविण्यात आले. मात्र महामार्गावर लख्ख प्रकाश पडावा, त्याचबरोबर वीज बिलामध्ये बचत व्हावी या उद्देशाने येथे एलईडी दिवे बसवण्यात येणार आहेत. याकरिता १० कोटी ४ लाख ७४ हजार ८८१ रुपये इतका खर्च येणार आहे. नवी मुंबई महापालिकेला दिल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून यासाठी आठ कोटी २९ लाख रुपये येणे अपेक्षित आहे; परंतु त्यासाठी विलंब होत असल्याने पनवेल पालिकेच्या अर्थसंकल्पातून या कामी खर्च करण्याचा प्रस्ताव आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ही रक्कम मिळाल्यानंतर ती अर्थसंकल्पामध्ये वर्ग केली जाणार आहे. दोन कोटी ८३ लाख रुपये इतका खर्च पाच वर्षांसाठी देखभाल करण्याकरिता येणार आहे. सात कोटी २१ लाख रुपये पथदिवे नूतनीकरणासाठी लागणार आहेत.

> पनवेल ते सायन महामार्गावरील दिवे गेल्या काही महिन्यांपासून बंद होते. त्यामुळे महामार्गावर अंधाराचे जाळे पसरून दररोज लहान-मोठे अपघात होत होते. यासंदर्भातील शेतकरी कामगार पक्ष व एका सामाजिक संस्थेने अखंडित पाठपुरावा केला. पनवेल महापालिकेकडून या ठिकाणी नवीन एलईडी दिवे बसवून त्याची पाच वर्षांकरीता निगा राखली जाणार आहे.
> – अमोल शितोळे, शहराध्यक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कामोठे

> पथदिवे हस्तांतरित करून त्यांच्या नूतनीकरणाचा आराखडा तयार केला आहे. तसेच तो सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठवण्यात आला आहे. मात्र त्यांच्याकडून निधी उपलब्ध होण्याआधी महापालिकेच्या अर्थसंकल्पातून यासाठी खर्च करण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. २० जूनच्या सर्वसाधारण सभेत हा विषय मांडला जाणार आहे.
> – प्रीतम पाटील, विद्युत विभाग प्रमुख, पनवेल महापालिका

इंटरनॅशनल हेल्थकेअर पुरस्काराने शीतल गायकवाड सन्मानित

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय कराटेपटू व क्रीडा शिक्षक कुमारी शितल कृष्णा गायकवाड यांना २०२२ सालचा इंटरनॅशनल हेल्थकेअर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबई अंधेरी येथील हॉलिडे इन हॉटेल येथे पार पडलेल्या भव्य सोहळ्यात हा पुरस्कार भारताचे माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांच्या हस्ते पुरस्कार शितल गायकवाड यांना प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारासाठी सहा हजार महिलांचे नामांकन आले होते. यात पाच महिलांची निवड करण्यात आली. यात शीतल गायकवाड यांचा समावेश असल्याचे शितल

गायकवाड यांनी सांगितले. दरम्यान शीतल गायकवाड यांनी यापूर्वीही अनेक राष्ट्रीय, आंतरराज्य राज्य पुरस्कार प्राप्त केले आहेत. शीतल गायकवाड या खोपोली येथील केएमसी महाविद्यालयात क्रीडा शिक्षक म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मुलींना प्रशिक्षित करण्यात खर्ची घातले आहे. के.एम.सी. महाविद्यालयातील प्राचार्य तसेच संस्थेचे अध्यक्ष सचिव व कार्यकरिणी यांचे नेहमीच सहकार्य मिळत असल्याचे शितल यांनी बोलताना सांगितले.

पनवेलमध्ये श्री शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल मध्ये श्री शिवसाह्यद्री संस्थेतर्फे रविवारी श्री शिव राज्याभिषेक सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा पनवेल मधील अश्वारूढ शिवाजी महाराज पुतळा परिसरात करण्यात आला. कार्यक्रम सोहळ्याच्या ठिकाणी शिवाजी महाराजांच्या मुख्य अश्वारूढ स्मरकास फुलांची सजावट आणि परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

सकाळी ठिक ९.३० वाजता प्रत्यक्ष राज्याभिषेक सोहळ्यास सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, राजश्री वावेकर, आ.बाळाराम पाटील, नगरसेवक प्रथमेश सोमण यांच्या हस्ते श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीस विधिवत मंत्रोच्चारारसहित

अभिषेक करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सर्वांना शुभेच्छा देऊन कार्यक्रमाचा उत्साह द्विगुणित केला. याचप्रसंगी पनवेल मधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अनेक कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या २०२० सालीच्या दुर्ग बांधणी स्पर्धा, निबंध स्पर्धा व संगीत पोवाडा गायन स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले व शेवटी श्री शिव सह्याद्री संस्थेच्या ढोल ताशा ध्वज पथकाच्या महावादनाने छत्रपती श्री शिवाजी महाराजांना मानवंदना देऊन कार्यक्रमाची सांगता केली.

कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. यावेळी संस्थेच्या या सोहळ्यास महत्वपूर्ण मदत व इतर सहकार्य नगरसेवक गणेश कडू, समीर दादा ठाकूर, आणि पनवेल शहर पोलीस यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी हेमंत हातनोलकर, विशाल धायजे, अभिजित कोकरे, तेजस मोरे, संदेश म्हात्रे, प्राजक्ता बद्रिके, भाग्यश्री परदेशी, निशांत म्हात्रे, समीर जाधव, हनुमान वायभासे, नरेंद्र चाचड व सागर मुंढे यांनी जबाबदारी पार पाडली.

पूर्ण नालेसफाई झाल्याशिवाय बिले देऊ नये

नगरसेविका लीना गरड यांची मागणी

। खारघर । प्रतिनिधी ।

पनवेल महापालिकेच्यावतीने नालेसफाई सुरु करण्यात आली. खारघर मधील काही ठिकाणी नालेसफाई सुरू केली मात्र नावापुरता पाहायला मिळाली. नगरसेविका लीना गरड (प्रभाग क्रमांक ५ सेक्टर १२) समन्वयक मधु पाटील (प्रभाग क्रमांक ४ सेक्टर १९), बालेश भोजने (प्रभाग क्रमांक ६ सेक्टर १०) यांनी नाल्यात उतरत व्हिडियो काढला. पण अजब गजब नालेसफाई समोर आली. नालेसफाई करताना फक्त मॅनहोल तसेच नाल्यावरील झाकण खालील सफाई केली आणि नाल्याच्या आजूबाजूला सफाई झालेली नाही. पहिला पाऊस येण्याआधी सर्व नाल्यातील गाळ आणि माती काढून पावसाच्या पाण्याला वाट करून द्यायला हवे होते मात्र दिखाव्यापुरता काम सुरू असल्याचे लीना गरड आणि त्यांच्या समन्वयकांनी व्हिडियो करत पोलखोल केली आहे.

स्वतः सभागृह नेते परेश ठाकूर यांनी खारघर नालेसफाईचा पाहणी दौरा केला होता. मात्र हा पाहणीदौरा होता की आणखी काय हा संशोधनाचा विषय आहे. दौरा करत त्यांनी काय सिद्ध केले. कारण होत असलेल्या नालेसफाई मध्ये नाल्याच्या आतमधील गाळ, माती तशीच आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याला अडथळा निर्माण होतो. आत मधून काढलेली माती तिथेच बाजूला टाकण्यात येते. आणि तीच माती पुन्हा नाल्यात जाते. नालेसफाईच्या नावाखाली ठेकेदारी, कमिशन घेणारे संपन्न झाले आहेत.

नगरसेविका तसेच कॉलनी फोरमच्या अध्यक्षा लीना गरड यांनी पूर्ण नालेसफाई झाल्या शिवाय कंत्राटदाराला बिले देऊ नये अशी मागणी केली आहे. फक्त नावापुरता सुरू असलेल्या नालेसफाईचा काय फायदा? मागील गोष्टींचा धडा घेऊन नालेसफाई केल्यानंतर त्वरित ही माती त्याचबरोबर कचरा उचलून टाकावा, असंही त्या म्हणाल्या.

अलिबाग समुद्र किनारी पावसाबरोबरच लाटांसोबत मजा लुटण्यासाठी पर्यटकांनी गर्दी केली होती.

श्रीवर्धनमध्ये दिव्यांगांना आधार

। दिघी । वार्ताहर ।

श्रीवर्धन तालुक्यातील दिव्यांगांना महानगर गॅस लिमिटेड मुंबई यांच्या सीएसआर योजनेंतर्गत भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम मुंबई (आल्मिको) निर्मित दिव्यांग उपयोगी उपकरणे व साहित्याचे मोफत वितरण शिबीर घेण्यात आले. शनिवारी झालेल्या या शिबिरात एकूण २१७ दिव्यांगांना साहित्याचे वाटप

करण्यात आले.

२१७ दिव्यांगांना साहित्याचे वाटप

रायगड जिल्हा समाज कल्याण विभाग व अपंग कल्याण विभागाचे अधिकारी तथा महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहकार्य अपंग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष शिवाजी पाटील यांच्या सहकार्याने स्थानिक एकता दिव्यांग कल्याणकारी संस्था श्रीवर्धन यांच्या माध्यमातून ए.आय.जे. हायस्कुल येथील प्रांगणात हे शिबीर संपन्न झाले.

के. झोराबियन यांना खालापूरमध्ये श्रद्धांजली

। पाताळगंगा । वार्ताहर ।

खालापूर तालुक्यातील डोलीवली येथील झोराबियन चिक्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक तथा दानशूर व्यक्तिमत्त्व के. झोराबियन यांना शनिवारी सायंकाळी असंख्य ग्रामस्थ व कामगार यांच्या उपस्थितीत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

झोराबीयन चिक्स कंपनीच्या प्रांगणात झालेल्या श्रद्धांजली सभेला जिल्हा सत्र न्यायालयाचे वकील राजेंद्र येरुणकर, खालापूर तालुका समन्वय समिती सभापती भाई शिंदे, झोराबियन यांच्या कन्या पेरीजाद, चिरंजीव सोहराब, व शहजाद, त्याचप्रमाणे विविध पक्षीय नेते वारकरी संप्रदायाचे सदस्य, विविध उद्योगांचे प्रतिनिधी, अधिकारी तसेच परिसरातील ग्रामस्थ व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेवटी पसायदानाने श्रद्धांजली सभेची सांगता झाली. दरम्यान परिसरातील वारकरी संप्रदाय रविवारी व सोमवारी सायंकाळी गणेश मंदिरात हरिपाठाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

पान १ वरुन

भाजपला सत्तेपासून दूर ठेवा

तुम्ही या माऊलीचा छळ करत आहात. तुम्हाला ही जनता शिक्षा केल्याशिवाय राहणार नाही, या शब्दात बाळासाहेब थोरात यांनी मोदी सरकारला बजावले. पुढच्या पिढीचा आपल्याला विचार करावा लागेल. संतांनी समतेचा विचार मांडला. हाच समतेचा विचार आपल्याला पुढे न्यायचा आहे. संत चोखामेळा, संत जनाबाई, संत गोरोबा काका यांनी समतेचा विचार मांडल्याचे बाळासाहेब थोरात म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यांचे जे मावळे होते ते सर्व समाजातील होते. सर्व समाजांचा हा महाराष्ट्र बनला आहे. ही परंपरा आपल्याला पुढे न्यायची असल्याचे उपस्थित पदाधिकाऱ्यांना सांगितले. महाराष्ट्रात काँग्रेसला पुढे कसे न्यायचे हा विचार करा. भाजपला सत्तेपासून दूर ठेवायचे आहे. नाही तर देश उद्ध्वस्त होईल. पक्षाची संघटना कशी मजबूत होईल याचाही विचार करा,असे आवाहन बाळासाहेब थोरात यांनी केले.

पैशांच्या देवघेवीवरुन महिलेचा खून

दोन मुलींसह खालापूर पोलिस ठाण्यात आले व त्याची पत्नी आशा वाघमारे ही १५ ते २० दिवसांपूर्वी कोळशाच्या भट्टीवर काम करणारे मजूर शोधण्यासाठी कर्नाटक येथील राठोड मुकादम यांच्या सोबत खालापुरातील वावोशी व रानसई या ठिकाणी अली होती पण तेव्हापासून ती बेपत्ता असल्याचे त्याने पोलिसांना सांगितलं तेव्हा पोलिसांनी त्यास त्या मयत महिलेच्या मृतदेहाचे फोटो व अंगावरील दागिने वैगेरे दाखवले असता काळूराम ने ती मयत महिला त्याची पत्नी आशा असल्याचे सांगितले. आणि खालापूर पोलीस ॲक्शन मोड मध्ये आले व तपासाची चक्रे जोरात फिरली. मिळालेल्या माहिती नुसार आशा वाघमारे ही मयत महिला त्यावेळी हिरामण जाधव यांच्या घरी आली होती.ती सुनिल पवार व कुमार वाघे यांना कोळशाच्या भट्टीवर कामाला नेणार होती व त्यासाठी तिने या दोघांना पैसे ही दिले होते.आणि लगेच कामावर चला असा तीने तगादा लावला होता.पण सुनील पवार ची बायको लगेच कामावर जाण्यास तयार नव्हती त्यामुळे त्या रात्री त्या दोघांचे कडाक्याचे भांडण झाले. त्यावेळी रागाच्या भरात सुनिल ने रात्री ९:३० च्या दरम्यान आशा वाघमारे ला बोरीची मळशी या जंगलाकडे घेऊन गेला व तिचा तेथे खून करून तिचा मृतदेह झाडी झुडपात फेकून तो दोन तासांनी घरी आला आणि अंघोळ करून परत कुठे तरी निघून गेला व पहाटे पुन्हा घरी येऊन त्याने पत्नी व मुलांना घेऊन तो तेथून निसटला.

पोलिसांनी त्याच्या मोबाईलच्या लोकेशन द्वारे तो अहमदनगर जिल्ह्यात असल्याचे शोधून काढले व एक पथक त्याच्या शोधात नगर ला पोहचले शेवटी माहितीच्या आधारे अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील हरडगाव या ठिकाणी आरोपी सुनील च्या मुसक्या आवळल्या आहेत.खालापूर याचे विरूद्ध खालापूर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक अनिल विभुते, सहा.पोलीस निरीक्षक गणेश कराड, युवराज सुर्यवंशी, पोलीस उप-निरीक्षक प्रदिप आरोटे, अविनाश पाटील, सहा. फौजदार विनोद सुर्वे, पोलीस हवालदार नितीन शेडगे, निलेश सोनावणे, हेमंत कोकाटे, विशाल सावंत, मनोज सिरतार, रणजित खराडे, बबन घुले यांनी कामगिरी पार पाडली.

कुडाच्या घरांचा आदिवासीना आधार

कुशल हातांची व अनुभवाची गरज असते. मात्र बनविण्यास वेळही खुप लागतो. घराच्या मध्यावर व बाजुने असलेल्या लाकडी खांबांवर लाकडाचे आडवे खांब टाकुन त्यावर कौले किंवा ढापे रचले जातात. आतील जमीन चांगली चोपून शेणाने सारवली जाते. बाहेर छानसी पडवी काढली जाते. कि झाले कुडाचे कौलारू घर तयार. कधी कधी भिंती विटांच्या उभारून त्याला मातीचा लेप चढवला जातो किंवा तशाच ठवेल्या जातात. जीवसृष्टीतल्या विघटक घटकांप्रमाणेच काही काळाने या कुडाच्या म्हणजेच कारवीची शेण व माती उभारुन केलेली भिंती कुजातात. आदिवासींच्या घराच्या भिंती कुजल्या की त्या काढल्या जातात. त्या भिंतींचे उत्तम खत होते, त्याला लागलेले शेण आणि माती जंगलातील किंवा परसातील रोपांचे पोषण करते. काही काळाने हीच रोपे पुन्हा हा आदिवासी समाज आपल्या भिंती बांधायला वापरतो. हे चक्र जणू काही निसर्गाच्या चक्राप्रमाणे अविरत सुरु राहते. घर आणि घराच्या भिंती बनविण्यासाठी लागणारा खर्च म्हणजे जंगलात जाऊन कारवी किंवा बांबू आणून तो विणायला जाणारा वेळ व मेहनत. आर्थिक खर्च तसा काहीच नसतो. असे कुडाचे घर बांधायला लागणारे लाकूड, झुडपे आणि माती सर्वच्या सर्व नैसर्गीक संसाधने हि पुढच्या पिढीला सहज उपलब्ध व्हावे म्हणून आदिवासी बांधव जंगल राखतात. आदिवासी समाजाचे पारंपरिक घर बांधणे, त्याची डागडुजी करणे हे तेथील जीवसृष्टीचा ऱ्हास करीत नाही, उलट त्यास फायदेशीर व उपयुक्त असते. या घराला सर्व सामान्यांच्या सिमेंट विटांच्या घरांप्रमाणे आर्थिक किंमत अजिबात नसते, पण या घराचे पर्यावरणाशी असलेले अतुट आणि कधीही न तुटणारे नाते हे अमुल्य असते. हातावर पोट घेवून फिरणाऱ्या या आदिवासी बांधवांना उन, वारा आणि पाऊस या पासून थोडा बचाव करण्याचा आधार हे कुडाचे घर देते. अशा सामान्यातील असामान्य गुण असलेल्या कुडाच्या घराशी आदिवासी बांधवांची नाळ अजूनही जुळलेला आहे. पारंपारीक स्वरुपात हस्तांतरीत झालेली हि घरबांधणीची कला कुठल्याही इंजिनिअर पेक्षा कमी नक्किच नाही.

वरदान आणि शाप

कारवीच्या काठ्यांना माती व शेण थापून तयार केलेल्या भिंती आणि व कौलारू छप्पर घरात थंडावा आणते. उन्हाळ्यात तर हे कुडाचे घर वरदानच ठरते. मात्र मोठा पाऊस वादळवारा आल्यास या भिंती उन्मळून पडण्याचा धोका असतो. तसेच या तकलादू भिंती सुरक्षित नसतात. कोणीही तोडून घरात प्रवेश करु शकतो. त्यामूळेच आदिवासींना पक्की घरे मिळणे आवश्यक आहे. काही इको व ऍग्री टुरिझमवाले तर अशा प्रकारची कारवीची म्हणजेच कुडाची घरे खास बनवुन शहरातील लोकांना आकृष्ट करत आहेत. अनेकजण पैसे खर्च करुन या घरांमध्ये राहणे पसंत करतात. असे सुधागड तालुक्यातील इको आर्किटेक्ट तुषार केळकर यांनी सांगितले.

राष्ट्रपतीपदासाठी विरोधकांची व्यूहरचना

राज्यसभेची निवडणूक संपताच आता राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीचे सर्वांना वेध लागले आहे. या निवडणुकीसाठी सत्ताधारी तसेच विरोधकांनी तयारी सुरु केली आहे. ही निवडणूक भाजपासाठी सोपी जाणार असल्याचे म्हटले जात आहे. मात्र असे असले तरी विरोधकदेखील या निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरणार आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी शरद पवार यांचे नाव समोर येत असेल तर आमचा त्यांना पाठिंबा राहील, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले आहेत. ते रविवारी पत्रकारांशी बोलत होते.

राज्यात कोरोना वाढतोय!

मुंबई : राज्यात मागच्या काही दिवसांपासून कोरोना रूग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. या दरम्यान रविवारी राज्यात तब्बल २९४६ नवे कोरोना बाधित रुग्ण आढळून आले आहेत. तर यातील १८०३ रुग्ण हे मुंबई शहरात आढळले आहेत आहे. त्यामुळे मुंबईकरांची चिंता वाढली आहे.

आज राज्यात २९४६ नव्या रुग्णांची नोंद झाली तर १४३२ रुग्ण बरे झाले आहेत. दरम्यान आज आढळलेल्या रूग्णांमध्ये सर्वाधिक रुग्ण हे मुंबई शहरातील असून राज्याच्या राजधानीत आज १८०३ रुग्णांची नोंद झाली. तर आज कोरोनामुळे झालेल्या मृत्यूंची संख्या दोन राहीली आहे. दरम्यान राज्यात कोरोना रुग्ण बरे होण्याचे प्रमाण हे ७.९२ टक्के इके राहीले आहे. तर मृत्यूदर हा १.८६ टक्के राहीला.

कोविडच्या रुग्णांची आकडेवारी दिवसेंदिवस वाढत असून रविवारी शहरात सापडलेल्या २३७ नव्या रुग्णांमुळे उपचाराधीन कोविड रुग्णांच्या आकडेवारीने एक हजाराचा आकडा पार केला आहे.

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद
माथेरान, ता. कर्जत, जिल्हा-रायगड, ४१० १०२
ई-मेल आयडी mcomatheran@gmail.com
जावक क्र. मागिनप :६७९:२०२२-२३ दिनांक १०-०६-२०२२

ई-निविदा सूचना

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद, जि. रायगड हे माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेला आपत्ती व्यवस्थापनासाठी लागणारे वस्तू व साहित्याचा पुरवठा करणे (फेरनिविदा-२) या कामाचे ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणाली होईल. सदर निविदा, नोटीसा, प्रसिद्धी, सुचना आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्रके इत्यादीची माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

सही/-
(सुरेखा भणगे)
मुख्याधिकारी
माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

तळोजा टँकरच्या भरोशावर

पाणीटंचाईमुळे उद्योगांना फटका; उद्योग राज्य मंत्र्यांकडे टीआयएचे गाऱ्हाणे

। पनवेल । वार्ताहर ।

नागरी वसाहती प्रमाणे तळोजा एमआयडीसीमध्येही पाणी टंचाई निर्माण झाली आहे. मागणीप्रमाणे पाणी मिळत नसल्याने आता कारखानदारांना टँकरने पाणी मागवावे लागत आहे. त्यामुळे वेळ आणि पैसे खर्च होत आहे. त्याचबरोबर उद्योग आणि उत्पन्नावर त्याचा परिणाम होत आहे. यासंदर्भात टीआयएने थेट उद्योग राज्यमंत्री आदिती तटकरे यांची भेट घेऊन आपले गाऱ्हाणे मांडले. याबाबत त्वरीत उपाययोजना करण्याच्या सूचना तटकरे यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

तळोजा परिसरात ९०७ हेक्टर जागेवर एमआयडीसी बसविण्यात आली. या ठिकाणी आजमितीला ८२३ छोटे-मोठे कारखान्यांची नोंद आहे. त्यामध्ये इंजिनीअरिंग, माशांवर प्रक्रिया, फूड, केमिकल्स आदी कारखानांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणात कारखाने आणि औद्योगीक उलाढाल होत आहे. तळोजा एमआयडीसीत दिपक फर्टिलायझर, फूट ग्लास. महाराष्ट्र वखार महामंडळ, किंग फिशर, भारत इलेक्ट्रॉनिक्स, बॉम्बे बेवरेज, विस्ता फुड यासारख्या मोठया कंपन्यांत आहेत. या ठिकाणी हजारो कामगार काम करतात. तळोजा औद्योगिक वसाहतीसाठी चाळीस ते पंचेचाळीस एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार एमआयडीसीकडून पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. परंतु सध्याला सुमारे १५ एमएलडी पाणी कमी मिळत आहे. त्याचा परिणाम उत्पन्नावर होत असून सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ही पाणी टंचाई गंभीर समस्या बनली आहे. त्यामुळे कारखानदारांना टँकरने पाणी घ्यावे लागत आहे. बॉयलर करिता पाण्याची नितांत गरज आहे. वेळेत आणि जास्त दराने पैसे देऊन सुद्धा एमआयडीसी आवश्यक ते पाणी देत नसल्यामुळे कारखानदार हवालदिल झाला आहे. याच प्रश्नावर टीआयएच्या पदाधिकाऱ्यांनी सतीश शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली उद्योग राज्यमंत्री आदिती तटकरे यांची भेट घेतली.

बिगर औद्योगिक पाणीपुरवठा कमी करणार

एमआयडीसीकडून सिडको आणि पनवेल महापालिकेला पाणीपुरवठा केला जात होता. हे प्रमाण जवळपास ९ एमएलडी आहे. आता बिगर औद्योगिक पाणीपुरवठा कमी करून हे पाणी उद्योगांना देण्यात येणार असल्याचे पाणी पुरवठा विभागातील उपअभियंता यशस्वी एस.व्ही.राऊत यांनी बैठकीमध्ये सांगितले.

यावेळी एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तळोजा इंडस्ट्रिजचे अध्यक्ष शेट्टी यांनी एमआयडीसी पाण्याची पाईपलाईन बांधणे, व्ही आणि टी ब्लॉकमधून जाणाऱ्या पाईपलाईन वळवून ती अभियांत्रिकी व केमिकल झोनपर्यंत विस्तारित करण्याचा प्रस्ताव दिला. हे पाऊल केमिकल आणि इंजिनिअरिंग झोनमधील पाण्याची समस्या कमी करेल असे मत त्यांनी व्यक्त केले. कारण पाणी नंतर उच्च गुरुत्वाकर्षणाने वाहू शकते, कारण पाण्याच्या पाईपलाईनच्या भौगोलिक संरेखनामुळे, जी उताराच्या मार्गावर चालते असेही सतीश शेट्टी यांनी सांगितले. राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी एमआयडीसीला त्यानुसार अतिरिक्त पाइपलाइन बांधण्याच्या सूचना केल्या. या मंजुरी करता सहा महिन्यांचा कालावधी लागेल असे अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. त्यानुसार त्वरित कार्यवाही करण्याबाबत यावेळी ग्वाही देण्यात आली.

यामुळे पाणीटंचाईच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघेल आणि त्यानंतर पंपिंगची गरज भासणार नाही असे टीआयएच्या सदस्यांनी सांगितले. यावेळी उद्योग विभागाचे सहसचिव, संजय देऊळगावकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवी कटकधोंड यांच्यासह तळोजा इंडस्ट्रियल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

म ह त्त्वा चे

आदिवासींसाठी आरोग्य शिबीर

। रोहा । प्रतिनिधी ।

खांबेरे ग्रामपंचायत हद्दीतील गायचोळ आदिवासी वाडी येथे हंटसमन इंटरनॅशनल इंडिया प्रा.लिमिटेड यांच्या पुढाकाराने व फ्रीडम फॉर यू फाऊंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने आदिवासी समाजातील नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १२२ नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना आरोग्य विषयक सल्ला देऊन आवश्यक प्रोटिन्स, लोह, खनिज यांची कमतरता दूर करण्यासाठी औषधांचे वाटप करण्यात आले.

काशिदचे स्टॉल्स गुरुवारपासून बंद

। कोर्लई । वार्ताहर ।

काशिद बीचवरील विविध खाद्यपदार्थ स्टॉल्स दि.१६ जून ते दि.१५ ऑगस्ट या कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहेत. पर्यटनात याठिकाणी असलेल्या स्पिडबोट, बनाना बोट, पॅरोसेलिंग बोट मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात बंद करण्यात आल्या आहेत तसेच पावसाळ्यात दि.१६ जून पासून येथील विविध स्टॉल्स दोन महिन्यांसाठी बंद करण्यात आले आहेत. या कालावधीत पर्यटकांनी पोहण्यासाठी समुद्रात जाऊ नये असे आवाहन केले आले आहे.

रुग्णालयांना मनपाकडून नियमांचा डोस

अग्निसुरक्षा प्रशासनाने उचलले पाऊल

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल परिसरातील रुग्णालयांना अग्निसुरक्षा नियमावली नुसार संरचनात्मक बदल केल्यास परवाने नूतनीकरण केले जाणार नाही अशा प्रकारचे धोरण पनवेल मनपाने अवलंबून रुग्णालय चालकांना नियमावर बोट ठेवून एक प्रकारे डोस दिला आहे. मात्र यात बदल करणे अवघड असल्याने रुग्णालय व्यवस्थापनाची डोकेदुखी एक प्रकारे वाढली आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खासगी रुग्णालय आहेत. पनवेल शहरासह नवीन पनवेल खांदा वसाहत, खारघर, कळंबोली, कामोठे येथे रुग्णालयांची संख्या जास्त आहे. बहुतांशी रुग्णालय हे पनवेल मनपा स्थापन होण्याच्या अगोदर सुरू झालेले आहेत. विशेषतः पनवेल शहरातील हॉस्पिटल फार वर्षांचे आहेत. रुग्णालयाच्या इमारती सुद्धा जुन्या आहेत. त्यांना पूर्वी पनवेल नगर परिषदेकडून परवाना मिळत असे त्याचबरोबर त्याचे नूतनीकरणसुद्धा येथेच केले जात होते. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून संबंधित रुग्णालयांना आता मनपाचा परवाना गरजेचा आहे.

अग्निसुरक्षेची नियमावली पाळण्याच्या सूचना

बदल केल्यास बांधकामाला धोका

पनवेल महानगरपालिकेने अग्नी सुरक्षा अंतर्गत संरक्षणात्मक बदल करण्याबाबतची नियमावली आणली आहे. वास्तविक पाहता बऱ्याच हॉस्पिटलचे संरचना ही महापालिका स्थापन होण्याच्या अगोदरची आहे. त्या काळात असलेल्या नियमानुसार तसे बांधकाम करण्यात आले होते. मात्र आता त्यामध्ये बदल करणे म्हणजेच इमारतींना धोका पोहोचण्याची शक्यता आहे. संबंधित हॉस्पिटलांना संरचनात्मक बदल करणे अवघड आणि कठीण आहे.

शाळा लवकरच सुरू होणार असल्याने शाळेचा गणवेश, रेनकोट खरेदीसाठी अलिबाग बाजारपेठेत गर्दी झाली आहे.

■ रविवारी रेल्वेचा मेगा ब्लॉक असल्याकारणाने पनवेल एसटी डेपोमध्ये प्रवाशांनी गर्दी केली होती. (छायाचित्र : राजेश डांगळे)

पोलादपूर नगरपंचायतीमध्ये राईट टू पी प्रश्नावर दुर्लक्ष

। पोलादपूर । वार्ताहर ।

पोलादपूर शहरासाठी सात वर्षांपूर्वी नगरपंचायत अस्तित्वात येऊनही नगरपंचायतीच्या विकासकामांमध्ये राईट टू पी प्रश्नावर सपशेल दुर्लक्ष झाले आहे. ग्रामीण भागातून बाजारहाट, बँका व कार्यालयीन कामकाजानिमित्त शहरात येणाऱ्या स्त्रिया व पुरूषांचे आरोग्य या गैरसुविधेमुळे धोक्यात आले आहे.

पोलादपूर शहरात लता कळंबे या तालुक्यातील माहेरवाशिणी चार वर्षांपूर्वी महामार्गावरील आरोग्यविषयक गैरसुविधेमुळे महिलांच्या कुचंबणेविरोधात राईट टू पी प्रश्नावर तब्बल तीन दिवस उपोषणाला बसल्या होत्या. यानंतर पेट्रोलपंप आणि महामार्गालगतच्या हॉटेल्स व एस.टी.स्थानकामध्ये सार्वजनिक स्वच्छतागृह याप्रश्नी सुसज्ज ठेवण्यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभाग तसेच राज्यसरकारकडून निर्णय घेण्यात आला. मात्र, यानंतरही पोलादपूर तालुक्याचे शहर असलेल्या पोलादपूर नगरपंचायतीने या प्रश्नी दुर्लक्ष करणे सुरूच ठेवले आहे.

स्त्रिया व पुरूषांचे आरोग्य धोक्यात

पोलादपूर शहरामध्ये तालुक्याच्या ग्रामीण भागातून अनेक महिला व पुरूष, तरूण-तरूणी शिक्षण, बँकेतील कामे, बाजारहाट, दूध व भाजीपाला, शासकीय कार्यालयीन कामकाज तसेच छोट्या मोठ्या नोकरीधंद्यांसाठी येत असून या सर्वांनाच दिवसभरामध्ये स्वच्छतागृहे तसेच मुतारीची गैरसोय जाणवू लागत आहे. पूर्वी तलाठी सजेच्या मागील भागात एक जुनी पडकी इमारत याकामी वापरात येत असे. मात्र, आता या इमारतीची जिर्णावस्था पाहता इमारतीचा जिर्णोद्धार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

वाहन चालकांनो जरा जपून....

हजारो सापांचा वाहनांखाली चिरडून हकनाक बळी

। पाली/बेणसे । धम्मशील सावंत ।

पावसाळा नुकताच सुरु झाला आहे. या हंगामात साप, सरडे इत्यादी सरपटणारे प्राणी भक्ष्य शोधत बाहेर फिरतात. खाद्य गोळा करण्यासाठी त्यांच्या हालचाली वाढत आहेत. मग बऱ्याच वेळा हे प्राणी रस्त्यावर येऊन वाहनांखाली चिरडुन त्यांचा मृत्यु होण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे हजारो सापांचा जीव जात आहे.

साधारणतः दिवड, धामण, नानेटी, घोणस, तस्कर, मांजऱ्या, नाग, मण्यार इत्यादी व काही दुर्मिळ सापांचा रस्त्यावर चिरडून अधिक प्रमाणात मृत्यू होत आहे. शेतकऱ्यांसाठी सुद्धा हे प्राणी अधिक महत्त्वाचे आहेत. विशेषतः साप तर शेतकऱ्यांचा मित्रच आहे. हे सर्व सरपटणारे प्राणी आपल्या पर्यावरणाचे आणि संबंधीत परिसंस्था अबाधित ठेवण्याचे काम करतात. अन्नजाळी आणि अन्न साखळीत या प्रत्येक प्राण्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. यातील एक जरी प्राणी विलुप्त झाला तर अन्नजाळी आणि अन्न साखळी खंडित होऊन पर्यावरचा समतोल बिघडू शकतो.

> आपल्या घरात, लोकवस्तीत किंवा औद्योगिक क्षेत्रात कोणताही साप आढळल्यास घाबरुन न जाता त्याला दुखापत न करता जवळील सर्प मित्रास बोलावणे आवश्यक आहे. घराबाहेर किंवा मोकळ्या जागेत साप असल्यास त्याला न घाबरवता वाट मोकळी करुन द्यावी. रस्त्यावर साप किंवा सरडे सापाला आपण स्वतः काही दुखापत किंवा डिवचल्या शिवाय तो आपल्याला काही करत नाही.
> – तुषार केळकर, सर्पमित्र

अखेर धनगरवाड्याला मिळणार रस्ता

। खोपोली । प्रतिनिधी ।

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षांपर्यंत खालापूर तालुक्यातील खानाव आणि खरीवली ग्राम पंचायतीमधील करंबेळी ठाकूरवाडी व खडई धनगर वाडा या आदिवासी गावांना रस्ता नव्हता. याबाबत स्थानिक लोकप्रतीधींनी प्रयत्न केले, परंतु यश येत नसल्याने यासाठी अखेर आदिवासींच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या नेतृत्वाखाली आदिवासी बांधावांनी स्वतःच पाठपुरावा करायला सुरुवात केली आणि या वाड्यांच्या रस्त्याचा मार्ग मोकळा होण्यास सुरुवात झाली असून उजळोली ते करंबेळी ठाकूरवाडी रस्त्याच्या पहिल्या टप्प्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

या रस्त्यासाठी पाठपुरावा करणारे रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक आरोटे, खालापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी महादेव शिंदे,पत्रकार सतिश शेवाळे, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खरीवली ग्रुप ग्राम पंचायत सरपंच संध्या परबळकर, खानाव ग्रुप ग्राम पंचायत सरपंच मंगेश पाटील, पोलीस पाटील सुधीर परबळकर, ग्राम पंचायत सदस्य राजू विचारे, धनगर समाजाचे नेते अनंता हिरवे आदी मान्यवर उपस्थित होते.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

१२-६-२०२२

श्री. दिलीप गजानन गुर्जर, अलिबाग



संपादकीय

जमिनीवर या

राज्यसभा निवडणूक निकालांमुळे तरी राज्यातील महाविकास आघाडी जमिनीवर येईल अशी अपेक्षा आहे. ठाकरे घराण्याचा मुख्यमंत्री असूनही आमदारांच्या निष्ठेबाबत पुरेशी खात्री देता येत नाही अशा दारूण अवस्थेतील शिवसेना आणि तीन पक्षांमध्ये अजिबात नसलेला ताळमेळ हे चित्र पाहता, या सरकारचा कारभार ठीक चाललेला नाही असे गेल्या आठवड्यात याच स्तंभामध्ये आम्ही म्हटले होते. निकालानंतर ते पूर्ण सत्य असल्याचे स्पष्ट झाले. निवडणूक लढवायची म्हणून लढवली नव्हती असे देवेंद्र फडणवीस यांनी निकालानंतर म्हटले आहे. ते खरेच आहे. निवडणुकीत विजयासाठी भाजप कोणत्याही थराला जाऊ शकतो हे अलिकडे वारंवार दिसले आहे. दोन वर्षांपूर्वी हैदराबाद महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी अमित शहा, आदित्यनाथ यांच्यापासून सगळे नेते उतरले होते. महाराष्ट्रात मुंबईसह बाकीच्या पालिका निवडणुकीत लवकरच आपल्याला तशीच घमासान लढाई बघावी लागणार आहे. त्यामुळे राज्यसभा निवडणूक ही सरळपणे पार पडणार नाही हे अपेक्षितच होते. संभाजीराजांना उमेदवारी न देऊन सेनेने विश्वासघात केला असा प्रचार आधी भाजपने केला. पण त्याचा फायदा झाला नाही. सेनेने साधे कार्यकर्ते असलेल्या संजय पवारांना मैदानात उतरवून भाजपवर मात केली. पण कोल्हापूरचे धनसत्ताधीश आणि सर्वपक्षमित्र धनंजय महाडिक यांना अतिरिक्त जागेसाठी उभे करून भाजपने बाजी पलटवली. इतरांपेक्षा कितीतरी जास्त असलेली एकगठ्ठा - म्हणजे १०६ - मते ही भाजपची ताकद होती. ती त्यांनी नीट वापरली. अशा अप्रत्यक्ष रीतीने होणाऱ्या निवडणुकांमध्ये दुसऱ्या पसंतीच्या मतांच्या नियोजनालाच सर्वाधिक महत्व असते. शरद पवारांसारखे निष्णात नेते असतानाही आघाडीकडून यात ढिसाळपणा झाला की दगाबाजी हे शोधावे लागेल. संजय राऊतांच्या मते तीन जणांनी फितुरी केली. तर त्या तिघांनी याचा इन्कार केला आहे. पवारही म्हणतात की मते फुटलेली नाहीत. पण भाजप गटाच्या एकूण मतांपेक्षा जास्त मते महाडिकांना पहिल्या फेरीतच मिळालेली दिसत आहेत. त्यामुळेच तर संजय पवार यांची दुसऱ्या पसंतीची मते मोजली जाण्याआधीच निकाल लागून गेला. आता निवडणूक होऊन गेल्यावर तरी आघाडीला आपल्या मतांचा हिशेब नीट लावता येईल अशी आशा आहे. निकालानंतर प्रतिक्रिया देताना राऊत यांनी हा संजय पवारांचा पराभव नव्हे तर घोडेबाजाराचा विजय झाला अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. हा कोल्ह्याला द्राक्षे आंबट यासारखा प्रकार झाला. शिवसेना नेते हितेंद्र ठाकूर आणि बाकीच्या अपक्ष व छोट्या पक्षांकडे केवळ विशुध्द पाठिंब्यासाठी गेले होते असे राऊत यांना म्हणायचे आहे काय? पण राऊत यांना टीव्ही वाहिन्यांपुढे चमकदार बोलण्याची सवय झाली आहे. भाजपसोबतच्या प्रचारयुद्धात राऊत यांची ही तोंडी हाणामारी उपयोगी असली तरी बुद्धिबळाच्या खेळात ती निरुपयोगी आहे. वृत्तवाहिन्यांना रोज सकाळ-संध्याकाळ बाईट्स देणे म्हणजे राजकारण करणे नव्हे, हे जितक्या लवकर त्यांना उमजेल तेवढे बरे. एकीकडे आमिषे आणि दुसरीकडे ईडी किंवा सीबीआय चौकशी मागे लावण्याची धमकी या दोन्ही आयुधांचा भाजप सर्रास उपयोग करीत असते हे आता उघड गुपित आहे. त्याला शह देण्यात आघाडीचे नेते सातत्याने अपयशी ठरत आहेत. राज्यसभा निवडणूक हे त्याचे आणखी एक उदाहरण आहे. अलिकडे भाजपने राज्य सरकारच्या राजीनाम्याची किंवा ते खाली पाडण्याची भाषा बंद केली आहे. त्याऐवजी, फडणवीस यांनी उद्धव यांना आता तरी चांगला कारभार करून दाखवा असे म्हटले आहे. आघाडीने त्यांचा सल्ला आता खरेच मनावर घ्यायला हवा. अन्यथा, जनतेच्या मनात त्यांच्याविषयी असलेली सहानुभूती घटत जाईल. यावेळच्या मतदानादरम्यान भाजपने तांत्रिक आक्षेप घेऊन आघाडीचे एक मत बाद करवण्यात यश मिळवले. आघाडीतील तीनही पक्षांना प्रत्येक क्षणी किती सावध राहण्याची गरज आहे हे पुन्हा एकवार दिसून आले. आता पुढची कसोटी विधानपरिषदेच्या वीस जूनला होणाऱ्या निवडणुकीत लागणार आहे. तिथेही भाजपने सदाभाऊ खोतांना अपक्ष उभे करून अतिरिक्त जागा पदरात पाडण्याचे डावपेच आखले आहेत. राज्यसभेच्या निकालातून आघाडीचे नेते किती शहाणपणा शिकले आहेत हे त्यावेळी दिसेलच.

वटपौर्णिमेच्या कथेचा खरा अर्थ

स्वाती पेशवे

सावित्रीने आपल्या पतीचे म्हणजेच सत्यवानाचे प्राण घेऊन जाणाऱ्या यमाशी तीव्र संघर्ष केला आणि त्याच्याकडून पतीचे प्राण परत आणून त्याचं मृत शरीर चेतनामय केलं अशी कथा आहे. मुळातच कल्पनारम्यता, अतिशयोक्ती, उदात्तीकरण आदींचं सिंचन असणारी ही कथा आजच्या बुद्धिजीवी आणि 'पुराव्यानिशी सिद्ध करा' म्हणणाऱ्या पिढीला पटणारी नाही. वटपौर्णिमेनिमित्त त्यांना त्यातला गर्भितार्थ समजून सांगायला हवा.

नानाविध पैलू, अस्तर आणि शिकवण तसंच संस्काराच्या हेतूने कथा-अपकथांची झालर असणारी आपली संस्कृती जगातल्या प्राचीन संस्कृतींपैकी एक आहे. मानवी सभ्यतेच्या अनेक जिवंत खुणा मिरवणाऱ्या या संस्कृतीचा आविष्कार अनेक सण-समारंभ आणि रुढी-परंपरांमधून घडताना दिसतो. भारतीय समाज त्याचा आजही श्रद्धापूर्वक अवलंब करतो. सध्याच्या यांत्रिक, वैज्ञानिक, आधुनिक युगातही या पाऊलखुणा जपण्याचा आपला प्रयत्न असतो. म्हणूनच कालबाह्य वाटाव्यात अशा अनेक प्रथा, कर्म, उपचार आजही श्रद्धापूर्वक पार पडताना दिसतात. वटपौर्णिमा हा असाच एक सण आहे. सावित्रीने आपल्या पतीचे म्हणजेच सत्यवानाचे प्राण घेऊन जाणाऱ्या यमाशी तीव्र संघर्ष केला आणि त्याच्याकडून पतीचे प्राण परत आणून मृत शरीर चेतनामय केलं अशी ही कथा आहे. मुळातच कल्पनारम्यता, अतिशयोक्ती, उदात्तीकरण आदींचं सिंचन असणारी ही कथा आजच्या बुद्धिजीवी आणि 'पुराव्यानिशी सिद्ध करा' असं म्हणणाऱ्या पिढीला पटणारी नाही. वैद्यकीय क्षेत्राने कमालीची प्रगती केली असली तरी मृत व्यक्तीमध्ये प्राण फुंकणारं कोणतंही तंत्र आज तरी मानवी दृष्टीक्षेपात नाही. कदाचित भविष्याच्या गर्भात मानवाची ही प्रगती लपलेली असावी, मात्र आज तरी याबाबत अंधार असल्याने एखाद्या उच्चशिक्षित मुलीने वा महिलेने ही प्रथा नाकारली तर आश्चर्य वाटायला नको. दर काही वर्षांनी काळ बदलतो तसा समाजही बदलतो, समाजरुढी बदलते आणि समाजव्यवहारही बदलतो. सहाजिकच त्यानुरुप सणांचं साजरीकरण अथवा त्याचा अन्वयार्थ बदलतो. म्हणूनच या बदललेल्या अर्थानिशी या सणाकडे बघण्याची गरज आहे.

सत्यवान-सावित्रीची कथा मुळात पती-पत्नीमधलं अथांग प्रेम, अलोट विश्वास आणि एकमेकांसाठी कितीही कष्ट घेण्याची तयारी या उदात्त भावनेवर आधारित आहे. सहाजिकच या सणाच्या निमित्ताने सात जन्म नाही तर किमान हा जन्म तरी पती-पत्नीने एकमेकांबरोबर सुखाने संसार करावा, ही अपेक्षा व्यक्त करायला हरकत नाही. खेरीज पूर्वी सावित्रीने पतीचे प्राण वाचवण्यासाठी संघर्ष केला असला तरी आजच्या समानतेच्या युगात पतीनेही पत्नीसाठी सर्व प्रकारचा त्याग करण्याची, तिच्यासाठी कोणत्याही प्रकारच्या संघर्षाला तयार राहण्याची गरज आहे. उत्सवीकरण आणि अंध साजरीकरणापेक्षा, वडाच्या फांद्या ओरबाडून पूजा करण्यापेक्षा एकमेकांना सतत साथ देण्याचं वचन देणं हेच आजचं यथोचित वटपौर्णिमा पूजन आहे.

वटसावित्रीच्या कथेतल्या सावित्रीने समस्त स्त्रियांना लढण्याचं, चिकाटी दाखवण्याचं आणि अंतिम उद्दिष्टं गाठेपर्यंत पाय रोवून उभं राहण्याचं बाळकडू दिलं आहे. स्त्री मुळातच चिवट आणि करारी असते. स्वत:पेक्षा दुसऱ्यासाठी जगणारी असते. दुसऱ्यावर मायेचा, प्रेमाचा वर्षाव करणारी असते. मुलगी, पत्नी, सून, भावजय, नणंद, वहिनी, काकू, मामी, मैत्रीण अशा एक ना अनेक भूमिका बजावताना त्या प्रत्येक नात्यात तिचा जीव अडकलेला असतो. पतीला परमेश्वर मानणारी स्त्री आजही त्याच्या प्रेमळ दृष्टिक्षेपाने मोहरते. त्याच्या एखाद्या गोड शब्दाने सुखावते. अशी ही स्त्री अनेकांशी विविध नात्यांमध्ये बांधली गेलेली असली तरी प्रत्येक नातं दृढ करणारं तिच्यातलं मातृत्व अधिक प्रभावी असतं. म्हणूनच केवळ सत्यवानाची सावित्रीच नव्हे तर अमक्यातमक्याची वहिनी, कोणाची आई, कोणाची मामी अथवा काकू मानवी क्षमतेच्या मर्यादा लंघून त्या त्या नात्यातला प्राण जपताना बघायला मिळते. त्यामुळे वटपौर्णिमा हा सण सावित्रीच्या अनेक रुपांचा गौरव करणारा आहे, असंही म्हणता येईल.

खरंच सध्याची सावित्री बदलली आहे. ती नवऱ्यासाठी प्राण पणाला लावते. नवऱ्याचे प्राण वाचवण्यासाठी अविश्रांत प्रयत्न करणाऱ्या अनेक महिला सावित्रीचं प्रतिरूप म्हणून समोर येत राहतात. एक उदाहरण समोर आहे. एक दिवस एका मुलीचा नवरा घरी आला तो नोकरी गेल्याची दुखद बातमी घेऊन... खरं तर तो क्षण पायाखालची जमीन हलवणारा होता. तोल ढासळणं स्वाभाविक होतं. पण ती त्याला म्हणाली, 'आज आपण बाहेर जेवायला जाऊ या. तेव्हा चांगले कपडे घाल, चेहरा हसरा ठेव. हीच तर आयुष्याची खरी सुरूवात आहे. तू एम.बी.ए. आहेस. आपण व्यवसाय सुरू करू. या व्यवसायात तू कोणाचा नोकर नाहीस तर मालक असशील. भागीदार म्हणून मला स्विकारशील का?' तिचे हे आश्वासक आणि आधार देणारे शब्द त्याच्यासाठी नवसंजीवनी ठरले नसते तरच नवल... आज त्यांचा संसार बहुअंगानं फुलला आहे. अशा वेळी ती वडाची पूजा करते की नाही हा प्रश्न निरर्थक ठरतो. ती उपवास करते की नाही या प्रश्नालाही अर्थ रहात नाही. इथे उरते ती फक्त सद्भावना. शेवटी हे सगळे सण प्रतीक स्वरूपात असतात. ही प्रतीकं शोधण्यात वेळ दवडायचा की त्यातल्या गोड भावनेचा अंगिकार करून आयुष्य सुखी करायचं, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.

लग्न टिकवायची ही प्रत्येक दांपत्याची मुलभूत प्रेरणा असते. घरोघरीचे सत्यवान आणि सावित्री कष्टपूर्वक संसाराचं रोपटं फुलवत असतात. सध्याचे सत्यवानही जागरूक आहेत. त्यांना पत्नीच्या कष्टाची कदर आहे. अनेकांना घराबरोबर बाहेरच्या कामांच्या सांभाळणाऱ्या बायकोचा अभिमान वाटतो. परिस्थिती बदलत असल्याचं हेच द्योतक म्हणायला हवं. शेवटी सावित्री झटते कशासाठी? संसारासाठी... सत्यवान-सावित्रीच्या पुराणकथेमध्ये सावित्रीचा संघर्ष दिसतो. पण प्राण परतल्यावर सत्यवानाने सावित्रीचा सन्मान केला का, या प्रश्नाचं उत्तर मिळत नाही. आता हे उत्तर देण्याची जबाबदारी आजच्या सत्यावानांवर आहे. आपल्या पत्नीला कुटुंबात आणि समाजात मान आणि आदर मिळावा यासाठी त्यांनीही जागरूक असायला हवं. पत्नीची पीडा, वेदना ओळखायला हवी. घरादाराची जबाबदारी सांभाळणाऱ्या या अन्नपूर्णेलाही विश्रांतीची गरज आहे हे जाणून घ्यायला हवं. रविवारी सकाळी 'आज संडे स्पेशल काय?' असा प्रश्न विचारण्यापेक्षा 'आज संडे स्पेशल तुझ्यासाठी आहे' असं म्हणायला हवं. एखाद वेळी या अन्नपूर्णेच्या हातातही भरलेलं ताट यायला हवं. व्रताची फलश्रुती एकांगी नको. केलेल्या व्रताचं फळ तिलाही मिळालं तर अधिक चांगलं नाही का?

महिलांना दुसऱ्याची काळजी घेणं, शुश्रूषा करणं शिकवावं लागत नाही. हे त्यांचे अंगभूत गुण आहेत. पण त्याची कदर करायला हवी. महिला पतीच्या स्वास्थ्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावण्यासही मागे-पुढे पहात नाही. एका मैत्रिणीचे पती डॉक्टर होते. दुर्दैवाने त्यांना किडनीचा विकार जडला आणि प्रत्यारोपणाशिवाय पर्याय नाही, हे सत्य समोर आलं. हे कळल्याबरोबर तिने क्षणाचाही विचार न करता स्वत:ची किडनी देऊ केली. दुसरं एक असंच उदाहरण आहे एका तरुण जोडप्याचं. या जोडप्यातल्या तरुणाच्या किडन्या खराब झाल्या होत्या. दोघांनी घरच्यांविरूद्ध जाऊन लग्न केलेलं... हा मुलगा मराठी आणि बायको सिंधी... आपल्या पतीच्या किडन्या फेल आहेत आणि त्याच्यावरील उपचारांसाठी दीड-दोन लाख रुपये खर्च येणार आहे हे कळल्यावर त्या पंचवीस वर्षीय तरुणीचं धाबं दणाणलं. पण या आघातातून सावरत तिने कंबर कसली. पतीच्या उपचारांचा खर्च भागवता यावा यासाठी ती वणवण भटकली. मित्रमैत्रिणींना गोळा करून सोशल कार्यक्रम सादर करत पैसे गोळा केले. असं करत तिने उपचारासाठी आवश्यक रक्कम जमवली. तिच्या कष्टामुळे तो युवक पुढची पाच वर्षं जगू शकला. खरं तर ही मुलगी सिंधी होती. तिने कधीही वडाची पूजा केली नसणार हे उघड आहे. पण म्हणून काय अडलं? तिने अंगिकारलेलं व्रत कमी दर्जाचं होतं का? अशी अनेक उदाहरणे देता येतील. म्हणूनच कर्मकांड नव्हे तर, प्रेमाची निखळ भावना महत्त्वाची...

आज घरोघरी अनेक सावित्री आजन्म हे व्रत अंगिकारताना दिसत आहेत. नवऱ्याशी पटत नसलं तरी संसाराचा डोलारा सांभाळत खंबीरपणे उभ्या आहेत. कारण त्यांना संसाररूपी रोपटं वृक्षामध्ये परावर्तीत करायचं आहे. संसाराचा वटवृक्ष झाला तरच चिमण्या पाखरांना हक्काचा आधार मिळू शकतो. घरोघरच्या सावित्री याच जाणिवेने संसाराला टेकू देऊन खंबीरपणे उभ्या आहेत. देशातच नव्हे तर विदेशातही त्यांच्या या कर्तृत्वाचा सन्मान होताना दिसतो. मध्यंतरीच पार पडलेल्या एका चाचणीमध्ये भारतीय गृहिणींना गृहकर्तव्यदक्षतेमध्ये ५८ टक्के गुण मिळाले. जगभर पार पडलेल्या या चाचणीमध्ये भारतीय गृहिणींनी मिळवलेले हे सर्वोत्कृष्ट गुण आहेत. जागतिक पातळीवर भारतीय गृहिणींचा उल्लेख 'अष्टभूजा' म्हणून केला जातोय. खरोखरच या आठ हातांचं बळ घेऊन त्या कामं ओढताना दिसत आहेत. अशा या सावित्रींचा सन्मान व्हायला हवा. त्यांची किंमत ठेवायला हवी. असं झालं तर घेतल्या व्रताचं इच्छित फळ मिळालं असं म्हणता येईल.

लक्ष हवं जैव विविधतेच्या संवर्धनाकडे

भारत हा जैव विविधतेच्या बाबतीत समृद्ध देश आहे. जैव विविधता केवळ परिसंस्थेच्या कार्याचा आधार बनत नाही तर देशातल्या उपजीविकेचाही आधार बनते. जगाच्या क्षेत्रफळाच्या २.४ टक्के असूनही नोंदलेल्या एकूणातील सात ते आठ टक्के प्रजाती आणि ३६ जैवविविधता हॉटस्पॉट्सपैकी चार भारतात आहेत. मोठी जैव विविधता असणाऱ्या जगातल्या १७ देशांमध्ये भारताचा समावेश आहे. म्हणूनच या जैवविविधतेचं संवर्धन गरजेचं आहे.

जैवविविधतेच्या बाबतीत भारताचं स्थान काय आहे, जैवविविधतेच्या क्षेत्रात भारताची भूमिका काय आहे आणि त्याच्या संवर्धनाचं मोठं आव्हान कोणतं आहे तसंच भारतातली जैवविविधता वाचवण्यासाठी सरकार काय प्रयत्न करत आहे या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आज शोधणं आवश्यक आहे. जैवविविधता हॉटस्पॉट म्हणजे काय, या सर्व बाबतीत तज्ज्ञांचं मत काय आहे हे ही समजून घेतलं पाहिजे. जैवविविधतेचं संवर्धन करण्यासाठी देशात अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. याअंतर्गत १०३ राष्ट्रीय उद्यानांची स्थापना करण्यात आली आहे. देशात ५१० वन्यजीव अभयारण्यं, ५० व्याघ्र प्रकल्प तर १८ जैव मंडळं आहेत. जैवविविधतेच्या संवर्धनासाठी राष्ट्रीय जैवविविधता कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

भारताने जागतिक जैवविविधता धोरणात्मक योजना स्वीकारली आहे. जगातल्या ३६ जैवविविधता हॉटस्पॉट्सपैकी चार भारतात आहेत. हिमाचल, पश्चिम घाट, इंडो बर्मा प्रदेश आणि सुंदरलँड हे हॉटस्पॉट आहेत. यात हिमालयात भूतानच्या उत्तर-पूर्वेचा, नेपाळच्या मध्य आणि पूर्वेकडील भागांचा समावेश होतो. त्यात माउंट एव्हरेस्ट आणि के-२ यासह जगातली सर्वोच्च शिखरं तसंच सिंधू आणि गंगा यासारख्या जगातल्या काही प्रमुख नद्या समाविष्ट आहेत. हिमालयात नष्ट होण्याचा धोका असणाऱ्या सुमारे १६३ प्रजाती आहेत. त्यात एक शिंग असलेला गेंडा, जंगली आशियायी जल म्हशी आणि ४५ प्रकारचे सस्तन प्राणी, १२ प्रकारचे उभयचर प्राणी, १७ प्रकारचे सरपटणारे प्राणी, ३६ वनस्पती प्रजातींचा समावेश आहे.

भारताचा दुसरा हॉटस्पॉट पश्चिम घाट आहे. हा प्रदेश पर्वतीय आणि सागरी आहे. या टेकड्या द्वीपकल्पीय भारताच्या पश्चिमेला आढळतात. या भागात चांगला पाऊस पडतो. तिथे ७७ टक्के उभयचर प्राणी आणि ६२ टक्के सरपटणारे प्राणी स्थानिक आहेत. या भागात पक्ष्यांच्या सुमारे ४५० प्रजाती, १४० प्रकारचे सस्तन प्राणी, २६० प्रकारचे सरपटणारे प्राणी आणि १७५ प्रजातींमधले उभयचर प्राणी आहेत. तिसरा प्रमुख हॉटस्पॉट इंडो बर्मा प्रदेश आहे. त्याची व्याप्ती ईशान्य भारत, म्यानमार आणि चीनमधला युनान प्रांत, व्हिएतनाम, कंबोडिया आणि थायलंडसह विविध देशांमध्ये विस्तारली आहे. या भागात १३ हजार ५०० वनस्पतींच्या प्रजाती पहायला मिळतात. त्यातल्या निम्म्याहून अधिक स्थानिक आहेत. या भागात जैवविविधता अत्यंत समृद्ध आहे; मात्र अलीकडच्या काळात या प्रदेशातल्या जैवविविधतेवर संकट आलं आहे. सुंदरलँड हे चौथं मोठं हॉटस्पॉट क्षेत्र आहे. हा प्रदेश दक्षिणपूर्व आशियामध्ये आहे. त्यात थायलंड, सिंगापूर, इंडोनेशिया, ब्रुनेई आणि मलेशियाचा समावेश आहे. २०१३ मध्ये युनेस्कोने या क्षेत्राला जागतिक जैवमंडल राखीव म्हणून घोषित केलं. या बेटांवर समुद्रातलं गवत आणि प्रवाळ खडकांचा समावेश असलेली समृद्ध स्थलीय तसंच सागरी परिसंस्था आहे.

- रुपाली केळस्कर

(क्रमशः)

ब्राह्मण आणि चांडाळ यांचे शरीर जरी सारखे नसले तरी ब्राह्मण आणि चांडाळ दोघांमध्येही भगवंत हे परमात्मा रुपाने उपस्थित आहेत. शरीर म्हणजे विविध प्राकृतिक गुणांची भौतिक निर्मिती आहे. परंतु आत्मा आणि परमात्मा हे आध्यात्मिक गुणात्मकदृष्ट्या समानच आहेत. गुणात्मकदृष्ट्या आत्मा आणि परमात्मा समान असले तरी ते परिणामकारकदृष्ट्या ते समान असू शकत नाहीत. कारण, आत्मा हा एका विशिष्ट शरीरातच उपस्थित असतो तर परमात्मा प्रत्येक शरीरामध्ये उपस्थित असतो. कृष्णभावनाभावित मनुष्याला याचे पूर्ण ज्ञान असते आणि म्हणून तो खऱ्या अर्थाने विद्वान असतो आणि त्याला समदृष्टी असते. आत्मा आणि परमात्म्यामधील समानता म्हणजे दोघेही सच्चिदानंद आहेत. परंतु दोहोंमधील फररक हाच आहे की, आत्मा हा केवळ विशिष्ट शरीराच्या मर्यादित क्षेत्रामध्येच चेतन असतो तर परमात्मा सर्व शरीरामध्ये चेतन सतो. परमात्मा हा शरीरामध्ये कोणत्याही प्रकारचा भेद न करता उपस्थित असतो.

इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ।।१९।।

इह- या जीवनामध्ये; **एव-**निश्चितच; **ते-** त्यांनी; **जितः-** विजय प्राप्त केला आहे; **सर्ग-**जन्म आणि मृत्यू; **येषाम्-** ज्यांचे; **साम्ये-** समानतेमध्ये; **स्थितम्-** स्थित आहे; **मनः-** मन; **निर्दोषम्-** निर्दोष; **हि-**निश्चितच; **सम्यम्-** समानता; **ब्रह्म-** ब्रह्माप्रमाणे; **तस्मात्-** म्हणून; **ब्रह्मणि-** ब्रह्मामध्ये; **ते-** ते; **स्थितः-** स्थित आहेत.

ज्यांचे मन एकत्व आणि समतेत स्थित झाले आहे त्यांनी जन्म आणि मृत्यूच्या बंधनावर पूर्वीच विजय प्राप्त केला आहे. ते ब्रह्माप्रमाणेच निर्दोष आहेत आणि याप्रमाणे ते पूर्वीच ब्रह्मामध्ये स्थित झालेले असतात.

तात्पर्य : वर उल्लेख केल्याप्रमाणे मनाची साम्यावस्था म्हणजे आत्मसाक्षात्काराचे लक्षण आहे, ज्यांनी वास्तविकपणे अशा अवस्थेची प्राप्ती केली आहे, त्यांनी भौतिक बंधने, विशेषतः जन्म आणि मृत्यू यावर विजय प्राप्त केल्याचे जाणले पाहिजे. जोपर्यंत मनुष्य या देहाशी तादात्म्य करतो तोपर्यंत त्याला बद्ध समजले जाते. परंतु जेव्हा तो आत्मसाक्षात्काराद्वारे साम्यावस्थेप्रत उन्नत होतो तेव्हा तो बद्ध जीवनातून मुक्त होतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर, त्याला भौतिक जगतात पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही तर तो मृत्यूनंतर आध्यात्मिक जगतात प्रवेश करु शकतो. भगवंत हे निर्दोष आहेत, कारण ते आसक्ती आणि द्वेषरहित आहेत. त्याचप्रमाणे जेव्हा जीव आसक्ती आणि द्वेषरहित होतो तेव्हा तो सुद्धा निर्दोष होतो आणि आध्यात्मिक जगतात प्रवेश करण्यास पात्र होतो. अशा व्यक्ती पूर्वीच मुक्त झाल्याचे समजले पाहिजे आणि अशा व्यक्तींच्या लक्षणांचे वर्णन खाली करण्यात आले आहे.

न प्रदृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ।
स्थिरबुद्धिरसम्मूढो ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः ।।२०।।

न- कधीच नाही; **प्रदृष्येत्-** हर्षित होतो; **प्रियम्-** प्रिय वस्तू; **प्राप्य-** प्राप्त झाल्यावर; **न-** होत नाही; **उद्विजेत्-** विचलित, उद्वेगित होतो; **प्राप्य-** प्राप्त झाल्यावर; **च-** सुद्धा; **अप्रियम्-** अप्रियाला; **स्थिर-बुद्धि-** स्थिर बुद्धी; **असम्मूढः-** मोहरहित; **ब्रह्म-वित्-** जो ब्रह्माला पूर्णपणे जाणतो; **ब्रह्मणि-** ब्रह्मामध्ये; **स्थितः-** स्थित.

जो मनुष्य प्रिय वस्तू प्राप्त झाल्यावर हर्षून जात नाही तसेच अप्रिय वस्तू प्राप्त झाल्यावर शोक करीत नाही, ज्याची बुद्धी स्थिर आहे, जो मोहरहित आहे आणि भगवत्विज्ञान जाणतो तो पूर्वीच ब्रह्मामध्ये स्थित असतो.

तात्पर्य : आत्मसाक्षात्कारी व्यक्तीची लक्षणे या ठिकाणी सांगण्यात आली आहेत. पहिले लक्षण आहे की, तो स्वतःच्या शरीराशी मिथ्या तादात्म्य करुन मोहित होत नाही. तो निश्चितपणे जाणतो की, आपण म्हणजे हे शरीर नाही तर आपण भगवंतांचे अंश आहोत. म्हणून तो शरीराशी संबंधित कोणतीही गोष्ट प्राप्त झाल्यावर हर्षित होत नाही तसेच शरीराशी संबंधित गोष्ट गमावल्याने शोकही करीत नाही.

(क्रमशः)

लोकसंसद

फास्टफूड आरोग्यास घातक

आहारातील घटकावर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असलेल्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी पुरेसा वेळ नाही मग मग आधार घेतला जातो तो फास्टफूडचा. झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. हे पदार्थ प्रकृतीला चांगले नसतात. त्यात खुप मीठ व साखर असते; शिवाय ते खूप तळलेले सुद्धा असतात. अतिप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे सल्ला डॉक्टर देतात तरी लोक काही ऐकत नाही मागील वर्षी एका फास्टफूड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेले ६० टक्के खाद्यपदार्थ आणि पेयांमध्ये शरीराला पोषक असे काहीही नाही. या कंपनीचे नूडल्स कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. याशिवाय चॉकलेट, केचप, सूप, पास्ता, वेफर्स, कुरकरे यासारखे पदार्थ विविध पदार्थ ही कंपनी बनवते विशेष म्हणजे हे सर्व पदार्थ मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही आपल्या मुलांच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. कंपनीने या पदार्थात पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफूडचा हट्ट सोडत नाही. जेंव्हा हे पदार्थ शरीरास हानिकारक असल्याचे सिद्ध झाले होते तेंव्हा याच कंपनीने आपल्या खाद्य पदार्थातून हानिकारक पदार्थ काढून टाकण्याची हमी न्यायालयात दिली होती. पेप्सीको आणि मॅकडोनाल्ड यासारख्या जगप्रसिद्ध कंपन्यांवर देखील असेच आरोप झाले आहेत. तरीही या कंपन्या बनवत असलेल्या फास्टफूडची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफूडमुळे मुलांना अनेक प्रकारच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफूड खाण्यात आल्यास हृदयरोग, टाईप २ प्रकारचा मधुमेह आणि स्थौल्याचा धोका आहे त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना फास्टफूड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफूड ऐवजी दूध-पोळी, पराठे - चटणी, कडधान्यांचा उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ मुलांना खायला द्यावे. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

- श्याम ठाणेदार, दौंड

ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांच्या निधनाने भारतीय चित्रकला शैलीतील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व हरपले. बेळगाव येथे जन्मलेल्या रवी परांजपे यांच्या घरात कलेचा वारसा होता. त्यामुळे लहानपणापासून त्यांना चित्रकलेची आवड निर्माण झाली. रवी परांजपे यांनी चित्रकलेचे उच्च शिक्षण बेळगाव येथील के. बी. कुलकर्णी चित्रमंदिर तसेच जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधून पूर्ण केले होते. कुंचल्याबरोबरच रंग संगतीवर प्रभुत्व असलेल्या परांजपे यांनी निसर्गचित्रे, व्यक्तिचित्रे, ऑइल पेंटिंग, रेखाचित्रे आणि स्केचेस, स्थिरचित्रे, बोध चित्रकारीता अशा अनेक चित्रप्रकारांत चित्रे रेखाटून आपली खास 'रवी परांजपे' शैली निर्माण केली. तसेच प्रकाशन, जाहिरात क्षेत्र, वास्तुशिल्प शास्त्र या क्षेत्रात देखील त्यांनी आपला ठसा उमटवला. रवी परांजपे यांनी विपुल लेखनही केले होते. त्यांचे 'ब्रश मायलेज' हे आत्मकथन, आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नियतकालिकांमध्ये केलेले संशोधनपर लेखन तसेच परदेशी चित्रकारांचा परिचय करून देणारे 'शिखरे रंग-रेषांची' हे पुस्तक, 'तांडव हरवताना' हे पुस्तक, 'नीलधवल ध्वजाखाली' हे लेखसंग्रहावर आधारित पुस्तक हे सर्व लेखन नवोदित चित्रकारांसाठी आदर्शवत ठरले आहे. रवी परांजपे यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये 'कम्युनिकेशन आर्ट्स गिल्ड'चा (कॅग) 'हॉल ऑफ फेम' हा जीवनगौरव पुरस्कार, दयावर्ती मोदी कला पुरस्कार, भैरूरतन दमाणी पुरस्कार, महाराष्ट्र राज्य जीवन गौरव पुरस्कार, रूपधर जीवन गौरव पुरस्कार या महत्वाच्या प्रतिष्ठित पुरस्कारांचा समावेश आहे. रंग-रेषांच्या माध्यमातून आपल्या उत्तुंग चित्र प्रतिभेचा अविष्कार लीलया साकारणाऱ्या ऋषितुल्य रवी परांजपे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

आपण कधी सजग होणार?

सेंटर फॉर इंटरनॅशनल अर्थ सायन्स इन्फर्मेशन नेटवर्क अर्थ इन्स्टिट्यूट कोलंबिया आणि येल सेंटर फॉर इनवोरमेण्ट लॉ अँड पोलिसी यांनी संयुक्तपणे जाहीर केलेल्या आकडेवारी नुसार भारत पर्यावरणाची काळजी घेण्याच्या यादीत खूप मागे असून १८० स्थानावर आहे. त्या मानाने आपले शेजारील राष्ट्रे पाकिस्तान (१७६) आणि बांगलादेश (१७७) तर चीन (१६०) स्थानावर आहे. हवेतील सातत्याने वाढत असलेले प्रदूषण आणि वायूंचे उत्सर्जन या दोन प्रदूषणकारी घटकांमुळे भारत यादीमध्ये टोकाच्या नंबरवर आहे. भारतात प्रदूषणामुळे दरवर्षी सुमारे २४ लाख मृत्यू होतात असे लेन्सेट चा अहवाल सांगतो. पर्यावरणाचा दृष्टीने व अहवालानुस

डोलवी एमआयडीसी विरोधात शेतकरी एकवटले

मोजणी अधिकाऱ्यांना पिटाळून लावले

। गडब । वार्ताहर ।

डोलवी एमआयडीसी प्रकल्पासाठी जमीन मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्याना येथील शेतकऱ्यानी सामूहिक विरोध करीत मोजणी करण्यास मज्जाव केला. यावेळी बहुसंख्य शेतकरी व महिला उपस्थित होत्या.

वडखळ, डोलवी विभागात जवळपास तेरा गावांमधे डोलवी एमआयडीसी प्रकल्प प्रस्थापित होत आहे. मात्र या प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता किंवा शेतकऱ्यांच्या जमिनी घेताना त्यांना कोणकोणत्या प्रकारच्या सुविधा देण्यात येणार आहेत याची कल्पना न दिल्याने शासन आमची दिशाभूल करून आमच्या जमिनी हडप करत असल्याचा आरोप करत शासनाकडून होणाऱ्या मोजण्यांना विरोध करून आम्ही आमच्या जमिनी मोजून देणार नाही अशी भूमिका येथील शेतक-यांनी घेतली व ग ज्या कोणी आमच्या शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेण्यासाठीचे खोटे संमतीपत्र तयार करून खोट्या सह्या केल्या आहेत त्यांच्यावर सर्वप्रथम गुन्हे दाखल करा अशी मागणी रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय जांभळे यांनी केली आहे. तर यावेळी आमदार रवि पाटील यांनी उपस्थित शेतकऱ्यांची भेट घेऊन प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांच्याशी संपर्क साधला आणि सदर मोजण्या करण्यापूर्वी शेतकरी आणि प्रशासन यांची येत्या सोमवारी बैठक लावण्याची विनंती केल्यानंतर त्यांची ती विनंती मान्य करण्यात आली. यापूर्वी सेझ नावाचा प्रकल्प येऊ घातला होता. त्यावेळी देखील शेतकऱ्यांनी एकजूट दाखऊन हा प्रकल्प हद्दपार करून दाखवला होता. त्याचीच पुनरावृत्ती म्हणून एमआयडीसी या प्रकल्पाला देखील विरोध दर्शवून होणारी मोजणी होऊ दिली नाही.

जागतिक बालकामगार प्रथाविरोधी दिनानिमित्ताने रायगड जिल्ह्यात जनजागृती करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते मोबाईल व्हॅन ला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. ही मोबाईल व्हॅन रायगड जिल्ह्यात अलिबाग , पेण ,पनवेल, खारघर इ. ठिकाणी फिरविण्यात येणार आहे.

फणस-आवक कमी, किमती वाढल्या

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

वटपौर्णिमा चार दिवसावर आली असतानाच बाजारात सर्वत्र फणस विक्रीसाठी आले आहेत. मात्र यावेळी उत्पादन कमी झाल्याने फणसाची तसेच सुट्या गऱ्यांची किंमती वाढल्याचे दिसत आहे.

यावर्षी फणसाचे उत्पादन फारच कमी आले असल्याचा बागायतदाराचे म्हणणे आहे, त्यामुळे नेहमीपेक्षा बाजारात विक्रीसाठी फणस फारच कमी प्रमाणात उपलब्ध असल्याची तक्रार विक्रेता करीत आहेत. वटपौर्णिमेला फणसाची मोठी मागणी लक्षात घेता, दर वाढले आहेत. शंभर, दीडशे, व दोनशे रूपये किंमतीची विक्री असलेले फणस सध्या बाजारात तिनशे, चारशे व पाचशे रूपयांच्या विक्री दर आहे. बाजारात फणसाची खरेदी करणारे ग्राहक वाढलेल्या दराने खुपच नाराज झाला आहे. गेल्या दोन वर्षात चक्री वादळ, अतिवृष्टीने बागायतदाराचे खुपच नुकसान झाले, बागायतीमध्ये चाळीस ते पन्नास फुट उंचीचे असलेली फणसाची झाडे कोलमडून पडली, यामुळे फणसाचे नेहमीचे उत्पन्नाचे प्रमाण प्रतिवर्षापेक्षा फारच कमी आहे, बागायतदाराना तर मोठ्या आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागले आहे.

पालीत फणस झाले स्वस्त

। सुधागड,पाली । वार्ताहर ।

यंदा फणसाचे उत्पादन भरघोस आले आहे. त्यामुळे जिल्ह्यात फणसाच्या किंमती निम्म्याने उतरल्या आहेत. गेल्या वर्षी १५० रुपये किलोने मिळणारे फणस आता अवघे १०० ते ११० रुपये किलोने मिळत आहेत. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील फणस देखील येथे विक्रीला आले आहेत.

वटपौर्णिमेला फणसाला सर्वात जास्त मागणी असते. यंदा फणस स्वस्त मिळत असल्याने सुहासिनी महिला देखील आनंदी आहेत. असे पालीतील लता माळी या गृहिणीने सांगितले. तर शरद निकुंभ म्हणाले की बाजारात मोठ्या प्रमाणात फणस उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे फणस खरेदीसाठी रेलचेल दिसत आहे.

मागील वर्षी लॉकडाऊन होते. बाजारात काही प्रमाणात निर्बंध देखील होते. परिणामी फणसाची आवक कमी होती. मागणी सुध्दा फार नव्हती त्यामुळे फणस महाग होते. मात्र यंदा आवक व मागणी अधिक आहे. कोरोनाचे सर्व निर्बंध हटविले असून फणसाचे उत्पादन देखील चांगले झाले असल्याने फणसाच्या किंमती उतरल्या आहेत.ग्राहकांचा पण चांगला प्रतिसाद आहे, असे व्यापारी सुभाष ओसवाल, यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

रोहिणी केळस्कर यांचा निवृत्तीनिमित्त सत्कार

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

अण्णासाहेब सावंत को-ऑप.अर्बन बँकेमध्ये असि.मॅनेजर म्हणून सेवानिवृत्त झालेल्या श्रीवर्धन येथील रोहिणी चंद्रकांत केळस्कर यांना बँकेच्या कलाविष्कार संस्थेतर्फे श्रीवर्धन येथे भावपूर्ण निरोप देण्यात आला.

कार्यक्रमासाठी कला-विष्कारचे सदस्य महाड, माणगाव,म्हसळा,बोर्ली पंचतन ठिकाणांहून मुद्दाम आले होते. कार्यक्रमात सत्कारमूर्ती केळस्कर यांचा कर्मचारी युनियनतर्फे लियाकत नाटुस्कर यांनी, कर्मचारी पतसंस्थेतर्फे अमित पाटेकर यांनी, कर्मचारी कलाविष्कार मंडळातर्फे चंद्रशेखर घोसाळकर यांनी, बँकेतर्फे प्रभाकर स. वाडकर व जगदीश कुलकर्णी, यांनी, ज्येष्ठ नागरिक संघातर्फे नरेश पुलेकर यांनी भेटवस्तू, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

चंद्रकांत केळस्कर यांचाही संजय वाईकर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात सर्वश्री अमित साळुंके, करिश्मा दवटे, चंद्रकांत घोसाळकर, पत्रकार आनंद जोशी, नरेश पुलेकर आदिंनी मनोगत व्यक्त केले. केळस्कर यांनीही ऋण व्यक्त केले. सूत्रसंचालन तेजस वनारसे यांनी केले. प्रसाद जोशी यांनी आभार प्रदर्शन केले.

महत्त्वाचे

महावितरणकडे अपुरी साधने

श्रीवर्धन : तालुक्यात महावितरणकडे वीज उपकरणांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा आहे. जुनी असलेली उपकरणे, त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी वापरात नसलेल्या वीजवाहिन्यावरील वीज उपकरणे काढून बिघाड झालेल्या वीज वाहिन्यांवरती अशा प्रकारची उपकरणे बसवावी लागत आहेत. श्रीवर्धन महावितरण कार्यालयाची अशाप्रकारे दुरावस्था असल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांना अंधारात राहावे लागत आहे. तरी श्रीवर्धन महावितरण कार्यालयात विविध उपकरणांच्या असलेल्या तुटवड्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी, त्याचप्रमाणे रायगडच्या पालकमंत्री यांनी त्वरित लक्ष घालून वीज उपकरणे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी केली जात आहे.

विद्यार्थ्यांचा सत्कार

म्हसळा : बारावीचा निकालात आयडियल इंग्लिश स्कूलआणि जुनिअर कॉलेज म्हसळा चा निकाल १००% लागला असून १००%निकाल लावण्याची परंपरा कायम राखण्यात प्राचार्य बोरी आणि त्यांचे सर्व शिक्षक वर्गाला यश मिळाले आहे. विद्यालयातील कुमारी अरिबा उकये हिने तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ८६.६७% गुण मिळऊन प्रथम येण्याचा मान मिळवीला असून दुसरा क्रमांक खलिया काझी (८५.६७%)तर तिसरा क्रमांक उमेमा हजवाने (८४.८३%) हिने पटकावला.

श्रीसमर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्थेच्या

पोलादपूर तालुकाध्यक्षपदी सागर शेलार

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

महाड येथील श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्थेच्यावतीने शुक्रवार दि.१० जून २०२२ रोजी पोलादपूर येथील श्रीदेवी गंगामाता सभागृहामध्ये श्रीसमर्थ दिव्यांग संस्थेच्या महाड तालुका अध्यक्षा दिप्ती शेडगे, खजिनदार आतीफभाई चाफेकर, सचिव मुबीन देशमुख, अनिल जाधव, महाड शहर अध्यक्ष शहजाद चरफरे उपस्थित होते.

जेष्ठ सलागार सुरेश पाटील यांनी पोलादपूर तालुक्यातील सर्व दिव्यांग बांधवांना व भगिनींना विविध योजनेबदल मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी पोलादपूर तालुक्यातील २५ ते ३० अपंग बांधव उपस्थित होते. याप्रसंगी श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्था पोलादपूर कमिटी तयार करण्यात आली असता कालवली येथील सागर शेलार यांच्याकडे पोलादपूर तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली. तालुका उपाध्यक्षपदी अब्दुल्लाह धामणकर, सचिवपदी अरूण कदम, सहसचिवपदी पांडूरंग मोरे आणि खजिनदारपदी दिलीप सावंत यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी सर्व दिव्यांग बांधव व भगिनींनी उपस्थित राहून श्रीसमर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्थेच्या कामकाजामध्ये सहभागी होऊन सक्रीय होत असल्याबद्दल स्वागत करण्यात आले.

प्रशासन आणि जनतेला जोडण्याचे काम पत्रकार करतो

। तळा । वार्ताहर ।

सामान्य जनता आणि प्रशासनाला जोडण्याचे प्रामाणिक काम हा पत्रकार करीत असतो. पत्रकारांच्या माध्यमातूनच गोरगरीब जनतेचे प्रश्न शासनापर्यंत पोहचतात. असे गौरवोद्गार रायगड जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी काढले.

झेंडे यांनी तळा पोलीस ठाण्याला भेट दिली .यावेळी पत्रकारांशी साधलेल्या संवादाप्रसंगी ते बोलत होते. ी तळा बाजारपेठेत अल्पवयीन मुलांचे वाहन चालविण्याचे प्रमाण वाढले असून बाजारात बेशिस्तपणे वाहन पार्क केले जात असल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते त्यामुळे शहरात वाहतूक पोलिसाची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी पत्रकारांकडून करण्यात आली.त्याला सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्यात येईल असे आश्वासन अतुल झेंडे यांनी पत्रकारांना दिले.

तळा शहर व तालुक्यातील विविध विषयांवर चर्चा देखील करण्यात आली.शेवटी पत्रकारांतर्फे अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी तळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे, संजय रिकामे,संध्या पिंगळे, विराज टिळक,नजीर पठाण,सुरज पुरारकर आदी पत्रकार उपस्थित होते.

मनसे संवाद दौरा

माणगाव : मनसे विद्यार्थी सेनेच्यावतीने संवाद दौरा सुरु करण्यात आला आहे.माणगाव येथे झालेल्या कार्यक्रमात प्रशांत कनोजिया ,यश सरदेसाई, देवेंद्र गायकवाड, दिलीप सांगळे, अमोल पेणकर, सुबोध जाधव, चेतन उतेकर, प्रतीक रहाटे, गोपाळ पवार प्रदीप फुलारे,रुपेश सकपाळ, दीपश्री घासे, मंगेश रावकर, दीपक चव्हाण, साईनाथ धुळे, ओमकार मोहिरे उपस्थित होते.

मोरा ते भाऊचा धक्का जलप्रवास सुरळीत

सव्वा लाख क्युबिक मीटर गाळाची बंदरातून सफाई

। उरण । प्रतिनिधी ।

मोरा बंदरातील चार कोटी रुपये खर्च करून एक लाख १८ हजार ९२७ क्युबिक मीटर साचलेला गाळ काढण्यात आला आहे. यामुळे समुद्राच्या ओहोटीमुळे बंद ठेवण्यात येणारी जल वाहतुकीची समस्या दूर झाली असल्याची माहिती मुंबई बंदर विभागाच्या कार्यालयातून देण्यात आली.

गाळामुळे मोरा-भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक ओहोटीमुळे बंद करावी लागत होती. यामुळे प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत होती. सातत्याने विस्कळीत होत असलेली उरण-भाऊचा धक्का प्रवासी लाँचसेवा सुरळीत करण्यासाठी महाआघाडी सरकारने मोरा बंदरातील साचलेला गाळ काढण्याला मे महिन्यांपासूनच सुरुवात करण्यात आली होती. ड्रेसिंग करून साचलेला गाळ काढण्याच्या कामासाठी चार कोटींची तरतूद करून निविदाही काढल्या होत्या. चार कोटी रुपये खर्चून मे महिन्याअखेरीस हे काम पूर्ण करण्याची मुदत होती.

बँकांनी खरिपाचे १००% उद्दिष्ट पूर्ण करावे

जिल्हाधिकाऱ्यांचे बँकांना निर्देश

। अलिबाग । प्रतिनिधी ।

आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये बँकांना ठरवून दिल्याप्रमाणे सरकारी, खाजगी, सहकारी बँकांनी खरिपाचे १००% उद्दिष्ट दि.३१ जुलै २ पूर्वी पूर्ण करावे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी दिले आहेत.

बँकांनी दि.३१ जुलै २०२२ पर्यंत प्रत्येक शाखेने किसान क्रेडिट कार्ड वाटप करण्यासाठी किमान ४ शिबिरांचे आयोजन करावे.त्याचबरोबर प्रत्येक शिबिरामध्ये ५० नवीन शेतकरी (प्रधानमंत्री किसान सन्मान योजना) लाभार्थी किसान क्रेडिट कार्डचा लाभ घेतील,असे नियोजन करावे. विद्यमान किसान क्रेडिट कार्डधारक कर्जदारांना घेतलेल्या कर्जाचे वेळेत परतफेड करून नवीन पीककर्ज घेण्यास प्रोत्साहित करावे, असे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी सूचित केले आहे.

जिल्ह्याचा मागील ५ वर्षांचा आढावा घेतला असता साधारणपणे ९० टक्के पीककर्ज वाटप झाले आहे. परंतू, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये एकूण उद्दिष्ट रु.३१० कोटी असताना रु.२४८ कोटी (७४%) इतके उद्दिष्ट साध्य झाले आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता एकूण खरीप कर्ज वाटपाचे उद्दिष्ट रु.२७२ कोटी इतके ठेवण्यात आले असून दि.३१ मे २०२२ पर्यंत जिल्ह्यातील बँकांनी रु.७२ कोटी १४ लाख (२७%) इतके उद्दिष्ट साध्य केले आहे.

आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्राधान्य क्षेत्रासाठी ठेवलेल्या उद्दिष्टामध्ये शेती कर्जासाठी रु.६३७ कोटी उद्दिष्ट असताना बँकांनी रु.८१६ कोटी (१२८%) कर्जवाटप केले आहे. तसेच व्यवसायासाठी रु.१ हजार ९६२ कोटी उद्दिष्ट असताना बँकांनी रु.२ हजार ६३० कोटी (१३४%) कर्जवाटप केले असून इतर प्राधान्य क्षेत्रासाठी रु.१ हजार ६२५ कोटी उद्दिष्ट असताना बँकांनी रु.१ हजार १०९ कोटी (६८%) कर्जवाटप केले आहे. त्याप्रमाणे बँकांनी रु.४ हजार २२८ कोटीचे उद्दिष्ट असताना रु.४ हजार ५५६ कोटी (१०८%) कर्जवाटप केले आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये असेच सक्रिय काम करून प्रत्येक बँकांनी खरिपाचे १००% उद्दिष्ट पूर्ण करून जिल्ह्याच्या विकासामध्ये आपले योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

कोकण वृत्त

रत्नागिरीत राष्ट्रवादीचा वर्धापनदिन

। चिपळूण । प्रतिनिधी ।

रत्नागिरी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २३ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. पक्ष कार्यालया समोर पक्षाचा झेंड्याचे ध्वजारोहण करण्यात आले तसेच रोप वाटप करण्यात आले.

यावेळी जिल्हा महिलाध्यक्षा चित्रा चव्हाण,तालुकाध्यक्ष जयंद्रथ खताते, महिला शहर अध्यक्ष दीपिका कोतवडेकर, माजी नागररसेविका फैरोज मोडक, माजी नगरसेविका सीमा चाळके, आरती महाडिक , छाया माने, आशा महाडिक, संगीता चव्हाण, रुपाली कदम, सचिन शिंदे, इक्बाल मुल्ला, खालिद पटाईत, दर्शन चव्हाण, रुपेश खेतले, नितीन पंदेरे, काशीराम वाजे, रामचंद्र पंदेरे, विनायक वाजे आदी उपस्थित होते.

डेरवण खुर्द येथे आरोग्य शिबीर

। चिपळूण । प्रतिनिधी ।

राधा-गोविंद फाऊंडेशन आयोजित, अपरांत हॉस्पिटल चिपळूण यांच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबीर डेरवण खुर्द येथे घेण्यात आले. यावेळी महिला व ग्रामस्थांची तपासणी करून औषधे देण्यात आली.

शिबिराला माजी सभापती पुजा निकम यांनी सदिच्छा भेट दिली व ग्रामस्थांच्या आरोग्यविषयक विविध समस्या जाणून घेऊन अपरांत हॉस्पिटलचे डॉ. अविनाश पाटिल यांच्याशी चर्चा केली. अपरांत हॉस्पिटलचे डॉ. अविनाश पाटील, प्रकाश काणसे, सरपंच अक्षता मुंढेकर, संजय मेस्त्री, संतोष चव्हाण, सरिता मेस्त्री, दिव्या मेस्त्री, शिलभद्र जाधव, दत्ताराम गुजर, वैशाली पाटील,साक्षी गावणंग, प्रिया विचारे, डॉ. प्राजक्ता जाधव व स्टाफ, व्ही. जे. गावडे, नॅब हॉस्पिटलचे यासिन कोठावळे, बचत गटाच्या महिला, अंगणवाडी सेविका व आशासेविका आदी उपस्थित होते.

घरडा हॉस्पिटलमध्ये डायलेसिस सेंटर

। चिपळूण । प्रतिनिधी ।

लवेल येथील घरडा हॉस्पिटमध्ये नुकतेच डायलेसिस सेंटरचा शुभारंभ लोटे परशुराम इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रशात पटवर्धन यांच्या हस्ते संपन्न झाला. रुग्णांना अगदी माफक दारात डायलेसिस सुविधा या ठिकाणी उपलब्ध करण्यात आली आहे. अत्याधुनिक डायलेसिस मशिन लोटे येथील घरडा केमिकल कंपनीमार्फत या रुग्णालयाला उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी घरडा केमिकलचे वरिष्ठ अधिकारी डॉ. के.शेणॉय, रामचंद्र कुलकर्णी, ए.सी.भोसले तसेच डॉ. संभाजी गरुड, मंगेश गद्रे, युनिट हेड शिवम सोनी, डॉ. चंद्रकांत ठोंबरे, डॉ. फिरोज पटेल, जनसंपर्क अधिकारी विवेक बनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

बेकायदा ८२ सायलेन्सरवर फिरविला बुलडोझर

वाढत्या ध्वनीप्रदुषणावरुन पोलिसांची कारवाई

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

वाहनांमधील सायलेन्सरमध्ये अनावश्यक बदल करीत शहरांत विविध कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली असल्याने ध्वनी आणि वायू प्रदूषण वाढले आहे. यामुळे नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी अशा वाहनांवर कारवाई करीत सायलेन्सर जप्त केले होते. अशा ८२ सायलेन्सरवर बुलडोझरद्वारे एकाचवेळी कारवाई करण्यात आली. यावेळी वाहतूक पोलिसांनी अशा शांतता भंग करणाऱ्या वाहनांवर पुढील काळात कारवाईत सातत्य ठेवण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पामबीच रस्त्यावर नवी मुंबई मुख्यालयाजवळ ही कारवाई करण्यात आली. यासाठी मुख्यालयाची पूर्वपरवानगी घेण्यात आल्याचे वाहतूक विभागाने सांगितले.

वाहनांमध्ये विशेषत: दुचाकींमधील हॉर्नच्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होत असल्याने सायलेन्सर लावले जात आहेत. मात्र वाहनचालक यात बेकायदा बदल करीत असून यामुळे विविध प्रकारचे कर्णकर्कश आवाज काढले जात आहेत. यामुळे मोठया प्रमाणात ध्वनी आणि वायू प्रदूषण होत असून नागरिक व इतर वाहनचालकांची शांतता भंग होत असते. अशा बेकायदा बदल केलेल्या वाहनांवर नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेत कारवाई करीत त्यांचे सायलेन्सर जप्त केले होते. जप्त केलेल्या ८२ सायलेन्सर नष्ट करण्याची कारवाई शुक्रवारी करण्यात आली. रस्त्यावर हे सायलेन्सर ठेवून त्यावर बुलडोझरद्वारे ते नष्ट करण्यात आले. कोटसायलेन्सरमध्ये बेकायदा बदल करणाऱ्या वाहनांचा शोध घेऊन त्यावर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. नागरिकांना अशी वाहने आढळून आल्यास हेल्प लाइनवर (७७३८ ३९३८ ३९)संपर्क साधावा.असे आवाहन केले आहे.

राज्यमार्गावरील भरावामुळे गटार झाले बंद

सांडपाणी येणार रस्त्यावर; ग्रामपंचायतकडून गटार मोकळे करण्याच्या सूचना

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ जवळ ममदापुर ग्रामपंचायत हद्दीमधून जाणाऱ्या डांबरी रस्त्याला लागून चक्क तारेचे कुंपण घालण्यात आले आहे. तर रस्त्याच्या कडेला मातीचा भराव टाकण्यात आला असून त्यामुळे राज्यमार्ग रस्त्याच्या कडेला असलेला नैसिर्गिक पाणी वाहून नेणारे गटार बंद झाले आहे. दरम्यान, मातीचा भराव बाजूला करून जेसीबी मशीनच्या सहाय्याने गटार खोदून घेण्याची सूचना ममदापुर ग्रामपंचायत यांच्याकडून संबंधित जमीन मालकाला करण्यात आली आहे.

कर्जत-कल्याण रस्ता नेरळ ग्रामपंचायतची हद्द सोडल्यानंतर ममदापुर ग्रामपंचायतची हद्द सुरु होते. त्या भागात रस्त्याच्या कडेला सर्व्हे नंबर १७४ ची जमीन आहे. त्यातील हिंसा नंबर ४ मध्ये माती उत्खनन करण्यात येत असून गेली महिनाभर त्या ठिकाणी मातीचे उत्खनन सुरु असून महसूल विभागाचे अधिकारी त्या ठिकाणी पोहचले नाहीत. शासनाचा महसूल बुडत आहे, त्याबद्दल महसूल विभागाला काही काळजी नसल्याने स्थानिक लोकांनी मूग गिळून बसण्याची भूमिका घेतली होती. मात्र गेल्या महिन्यापासून स्थानिक रहिवासी ॲड.गजानन डुकरे यांनी त्या ठिकाणी सुरु असलेल्या मातीचा भराव रस्त्यावर आल्याने त्या मातीच्या उत्खनन आणि भरावाबद्दल आवाज उठविला आहे. संबंधित जागेचे सपाटीकरण करताना २५ फूट उंचीचा मातीचा डोंगर फोडण्यात आला आहे. त्याबद्दल महसूल विभागाचे अधिकारी का पोहचले नाहीत? आणि ते मूग गिळून बसले असल्याबद्दल स्थानिकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

परंतु राज्यमार्ग रस्त्याच्या कडेला करण्यात आलेल्या मातीच्या भरावामुळे रस्त्याच्या बाजूने वर्षनुवर्षे असलेले गटार बंद झाले आहे. राज्यमार्ग रस्त्याच्या बाजूला शासनाची किमान दोन मीटर पर्यंत जमीन असते, मात्र ममदापुर येथे रस्त्याच्या बाजूला चक्क मातीचा भराव करून काटेरी कुंपण घालण्यात आले आहे. त्यामुळे पावसाळ्यात दिव्यादिप हॉटेल पासून येणारे सांडपाणी वाहून नेणारे गटार बंद झाल्याने ते सांडपाणी थेट रस्त्यावरून वाहून जाणार आहे. टीवाले हॉटेल आणि तेथे मागे असलेल्या चार इमारत त्यांचे सांडपाणी देखील त्याच गटाराने राज्यमार्ग रस्ता ओलांडून नाल्याकडे जात असते. मात्र आता मातीचा भराव करताना रस्ताच्या जवळ भराव करताना थेट काटेरी कुंपण घालण्यात आल्याने स्थानिक संतप्त झाले आहेत. स्थानिकांनी याबाबत ममदापुर ग्रामपंचायतकडे आपल्या तक्रारी केल्या असून रस्त्याचे जुने गटार पुन्हा खोदून देण्याची मागणी केली आहे.

> ग्रामपंचायत हद्दीमध्ये रस्त्याच्या बाजूला असलेले गटार मातीचा भराव टाकताना बुजला आहे. ते गटार जेसीबी मशीनच्या साहाय्याने खोदून देण्याची सूचना संबंधितांना केली आहे. पावसाळा जवळ आल्याने त्यांना तात्काळ गटार खोदून देण्याचे कळविले आहे. मात्र त्यांच्याकडून गटार काढले नाही तर लेखी कळविले जाईल आणि त्यानंतर कारवाई केली जाईल.
> – संजय राठोड, ग्रामविकास अधिकारी ममदापुर.

> रस्त्यावरील गटार बंद केल्याबद्दल तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार रस्त्याची पाहणी केली जाणार आहे. स्थळ पाहणी करून कारवाई करण्याबाबत निर्णय घेतला जाईल. त्यासाठी शाखा अभियंता स्थरावर पाहणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
> – संजीव वानखेडे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

म ह त्त्वा चे

बस थांबा शेड बांधून द्यावी

। पनवेल । वार्ताहर ।

मानसरोवर स्टेशन ते कळंबोली (बस क्र-५६) या मार्गावर बस थांबे शेड बांधून कायम स्वरूपी उभारण्याची मागणी शिवसेनेने पनवेल महानगर पालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे. राकेश गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन त्रिमुख यांनी कल्पिता पिंपळे उपायुक्त पनवेल महानगर पालिका यांना निवेदन दिले.

कंपनीला आग

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

नवीन पनवेल येथील प्लॉट नंबर ५२ वरील रूम फ्रेशनर बनविणाऱ्या कंपनीला सकाळी आठच्या सुमारास आग लागली. ताबडतोब अग्निशामक दलाला कळविण्यात आल्याने त्यांनी पंधरा ते वीस मिनिटात आगीवर नियंत्रण मिळवले व पुढील अनर्थ टळला. नवीन पनवेल, सेक्टर १ एस येथील एचपी गॅसच्या पाठीमागील बाजूस असलेल्या एरोकेअर कंपनीला ११ जून रोजी सकाळी आग लागली. याआगीत रुम फ्रेशनर बनवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ल्युमिनियम, झाकणे, त्याचे बटण, पुठ्ठा जळून खाक झाला. या आगीची माहिती नवीन पनवेल अग्निशामक दलाला देण्यात आली. त्यानंतर नवीन पनवेल अग्निशमन दलाच्या दोन गाड्या, महापालिकेची एक व कळंबोलीची एक गाडी घटनास्थळी दाखल झाली. अग्निशामक दलाच्या जवानांनी यावेळी आतमध्ये असलेल्या दोन माणसांना बाहेर काढले.

हिरवळतर्फे शिवस्वराज्य दिन साजरा

। माणगाव । वार्ताहर ।

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे शिवस्वराज्य दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी उपस्थित होत्या.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. डॉ. संध्या कुलकर्णी यांनी सर्व उपस्थितांना महाराजांच्या जीवन कार्यावर माहितीपर व्याख्यान दिले. महाविद्यालयाचे प्रा.सुदेश कदम यांनी आपल्या मनोगतामधून विद्यार्थ्यांना महाराजांचे आचार-विचार, महाराजांचे कार्य समजून घेऊन त्यांना आपल्या दैनंदिन जीवनात अंगिकारण्याचे आ-वाहन केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा.कोमल गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा एकमेव प्रत्यक्षदर्शी दुर्गदुर्गेश्वर रायगडाच्या इतिहासाची माहिती पुरविण्यासाठी किल्ले रायगडावर आधारित चित्रफीत दाखवली

■ पाऊस सुरू झाल्याने खोल समुद्रातील मासेमारी बंद असल्याने बोटी किनाऱ्यावर ओढल्या असून या बोटी शाकारण्याचे काम सुरू असल्याचे दिसून येत आहे. (छायाचित्र : संतोष रांजणकर)

दूधभुकटीप्रकरणी अद्याप कारवाई नाही

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

दोन आठवड्यांपूर्वी आंगणवाडीच्या मुलांना वाटण्यात येणारी दुधाची भुकटी पनवेल पंचायत समितीच्या कार्यालयात जाळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. याबाबत अद्याप कोणावरही कारवाई करण्यात आलेली नाही.

दोन आठवड्यापूर्वी पनवेल पंचायत समितीच्या कार्यालयात अंगणवाडीतील लहान मुलांना वाटण्यात येणारी दुधाची भुकटी जाळल्याचा प्रकार उजेडात आणला होता. याप्रकरणी मात्र अद्याप कोणतीही चौकशी झालेली नाही. दुधाची भुकटी जाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली जात आहे. मात्र या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न एकात्मिक बाल विकास प्रकल्प विभागाकडून केला जात असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे पत्र लिहून याबाबत खुलासा मागितला असल्याची माहिती दिली.

मान्सून दाखल होताच बत्ती गुल

मुरुड परिसरात सलग दोन रात्री वीज गायब झाल्याने नागरिक हैराण

। मुरूड । वार्ताहर ।

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार सतत हुलकावणी देणाऱ्या मान्सूनने अखेर कोकणामध्ये प्रवेश करत मान्सून दाखल झाल्याची हजेरी लावली. मुरूडमध्ये दि. १० रोजी सायंकाळी पावसाने रिमझिम रिमझिम बरसत ढगांच्या गडगडाटासह सुरुवात केली. त्यामुळे बळीराजा सुखावला पण मुरुड तालुक्यातील संपूर्ण वीज प्रवाह १५ तासांहून अधिक काळ खंडित झाल्याने मुरुडची बत्ती गुल झाली. त्यामुळे नागरिकांना रात्रभर झोप न मिळाल्याने पुरते हैरान झाले होते. दुसऱ्या दिवशी पुन्हा रात्री वीज पुरवठा खंडित झाला त्यामुळे दोन रात्री वीजग्राहक हैराण झाले आहेत.

गेले तीन महिने महावितरण दर मंगळवारी वीज प्रवाह खंडित करुन दुरुस्ती व देखभाल करीत होते ते कशासाठी असा प्रश्न वीजग्राहकांना पडला आहे.

या पहिल्याच पावसामध्ये मुरूड तालुक्याची संपूर्ण विज खंडित झाल्याने रात्रभर उकाड्याने व मच्छरने हैराण झालेल्या नागरिकांना झोपेचे खोबरे करावे लागेल. याबाबत सोशल मीडियावर उलट सुलट चर्चा सुरू होती. गेल्या तीन महिन्यांपासून विद्युत वाहिन्यावर वाढलेली झाडे, झुडपे तोडण्याच्या नावाखाली व दुरुस्ती करण्याकरता दर मंगळवारी वीज प्रवाह खंडित करण्यात येत होते मग पहिल्याच पावसामध्ये असे कसे झाले असा सवाल वीज ग्राहकांना पडला आहे.

मुरुड तालुक्याला पाबरा येथून वीज प्रवाह होत असल्याने सुरुवातीच्याच पावसात पाबरा येथे मुख्य वीज वाहिनीवर झाड पडल्याने उच्च दाब वीज वाहिनी तुटून मुरुड तालुक्याला होणारा वीज पुरवठा खंडित झाला होता. वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर महावितरणचे कर्मचारी काम करीत होते. तब्बल १५ तासानंतर मुरुडचा वीज पुरवठा सुरू झाला.

मुरुडमध्ये अंडरग्राऊंड वीज वाहिन्यांची कामे अर्धवट

महावितरणचा भोंगळ कारभार

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुड शहरात वारंवार वीजपुरवठा खंडित होऊ नये म्हणून गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेली अंडरग्राऊंड वीज वाहिनी टाकण्याची कामे अद्यापही अर्धवट अवस्थेत असल्याने महावितरणच्या भोंगळ कारभाराबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजाला हुलकावणी देत राज्यात, कोकणात मान्सून दाखल झाला. दहा जूनच्या रात्री मुरुडमध्ये वीजांच्या कडकडाट पहिला पाऊस पडतो न पडतो तोच वीजपुरवठा खंडित झाला आणि महावितरणच्या भोंगळ कारभाराचा शहरातील नागरिकांना प्रत्यय आला. वीज पुरवठ्याअभावी तासन्तास त्रास सहन करावा लागला.

पाच वर्षांपूर्वी मुरुड शहरात अंडरग्राऊंड वीज वाहिन्यांची करण्यात येत असलेली कामे अद्यापही अर्धवट अवस्थेत असून काही ठिकाणी दुरवस्था पाहावयास मिळते आहे. मुरुड शहरात अनेक ठिकाणी नारळ सुपारीच्या बागा रस्त्यालगत आहेत. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या वीज समस्यांना तोंड देण्यासाठी जमिनीतून (अंडरग्राऊंड) वीज वाहिनी टाकण्याचे काम सुरू करण्यात आले होते. सद्यस्थिती व कामाचा दर्जा पाहाता यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून शासनाने यासाठी अंदाजित कोट्यावधी रुपयांचा केलेला खर्च वाया तर गेला नाही ना असे असेल तर याला जबाबदार संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्याकडून नुकसानीची भरपाई घेण्यात यावी, असे बोलले जात आहे. अंडरग्राऊंड वीज वाहिनी टाकण्यात आली तर शहरातील वीज समस्या कायमची नष्ट होईल व मग मेंटेनन्स करायला मिळणार नाही? यामुळे तर हे काम रखडले नाही ना? असा सवाल नागरिकांतून विचारला जात आहे.

जनतेने कर रुपातून भरलेल्या पैशातून निधीतून विविध विकास कामे पूर्ण केली जातात. मुरुड-जंजिऱ्याला पर्यटनाचा दर्जा प्राप्त झाला असून केंद्र सरकारच्या दिनदयाळ उपाध्याय योजनेतून शहरातील अंडरग्राऊंड वीज वाहिनी टाकण्यासाठी कोट्यावधीचा निधी मंजूर झाला. स्थानिक लोकप्रतिनिधी व न.प.चे तत्कालीन सत्ताधारी यांनी मुरुडच्या वीजप्रश्नी औचित्य दाखविले नाही.

शहरातील अंडरग्राऊंड वीज वाहिन्यांची कामे अर्धवट अवस्थेत असल्याने याची संबंधित अधिकारी व ठेकेदार यांची सखोल चौकशी होऊन शासन उचीत कारवाई करण्यात कोणती भूमिका घेते. याकडे लक्ष लागून राहिले असून ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येऊन वीजपुरवठा सुरळीत व्हावा, अशी भावना जनमानसातून व्यक्त केली जात आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ हॉटेलमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत – वेटर, हाऊसकिंपिग हेल्पर, कुक इत्यादी फोन– ८५५४८३६६६५, ८२०८४५९४२४

■ Open Plot for Sale in mhada colony Alibag Plot No. 216, Area 48 sq. mtr. Invester can construct 750 sq. ft construction plus open terrace walkable distance to Alibag, Raigad Bazar. No Broker Please. Invester are welcome. Please contact 7709336280

■ अलिबाग गोंधळपाडा येथे सुसज्ज सोसायटीमध्ये 4BHK 685 sq.ft. + टेरेस; २४ तास सिक्युरिटी Children Park, Joging Track २४ तास पाणी, लिफ्ट असा फ्लॅट विकणे आहे. संपर्क : ७०४५००६६५७३.

■ गोंधळपाडा–वेश्वी येथील डॅफोडील्स सोसायटी मधील 1BHK फ्लॅट क्षेत्रफळ ६८५ (ओपन बाल्कनी सहीत) विकणे आहे. संपर्क क्र. ७७९८४३८८५५ एजंट क्षमस्व.

■ अलिबाग नगरपरिषद हद्दीमध्ये एस.स्टँडजवळ व्यापारी गाळा भाड्याने देणे आहे. क्षेत्र : ३०० sq.ft. संपर्क : ९७६४१४९१४३, ९२२१६८०२८४

■ श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

■ साईश्रद्धा फाऊंडेशनच्या बांधण येथील शाळेकरीता शिक्षिका पाहिजे. तसेच स्किल डेव्हलपमेंट सेंटरसाठी कौऊन्सेलर कम क्लार्क मोबिलायझर व विविध ट्रेडसाठी शिक्षक पाहिजेत. बायोडाटा व्हॉटसअप करा. ८३९०९०९४७०

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

नेरळ येथे दुभत्या म्हशीला विजेचा धक्का

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ जवळील नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील धामोते गावातील प्रभात अपार्टमेंट जवळ विजेची वाहिनी खाली जमिनीवर कोसळली होती आणि त्या विजेच्या वहिनीला धक्का लागल्याने शेतकऱ्याची दुभती म्हैस जागीच मृत्युमुखी पडली. याबाबत शेतकऱ्याने आपल्याला आर्थिक मदत मिळावी अशी मागणी केली असून नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

भूषण दत्तात्रय गोमारे या शेतकऱ्यांच्या म्हशी कोल्हारे गावातून धामोते अंबानी बोपेले भागात चरायला येत असतात. नेहमीप्रमाणे गोमारे आपल्या म्हशी घेऊन १० जून रोजी सायंकाळी धामोते भागात आले होते. त्यावेळी प्रभात अपार्टमेंट एका म्हशीला तेथे जमिनीवर कोसळलेल्या विजेच्या वाहिनीचा धक्का बसला आणि काही क्षणातच ती म्हैस तेथे पडली. शेतकऱ्याने आजूबाजूच्या शेतकऱ्यांना गोळा केले असता संबंधित म्हैस ही मृत असल्याचे निदर्शनास आले असता स्थानिकांनी महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना त्या ठिकाणी बोलावून घेतले आणि वीज प्रवाह तपासून घेतला. मात्र म्हैस मृत झाल्याने शेवटी संबंधित शेतकऱ्याने नेरळ पोलीस ठाणे येथे जाऊन महावितरणाच्या चुकीमुळे आपली म्हैस जीवानिशी गेली असल्याची तक्रार दिली आहे. गोमारे यांनी महावितरण कंपनीवर नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

भूषण गोमारे यांनी आपली मृत झालेली म्हैस किमान एक लाख रुपयांची होती असा दावा केला आहे तर याबाबत महावितरण कंपनीकडून नुकसानभरपाई मिळावी यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल अशी माहिती महावितरणचे शाखा अभियंता राठोड यांनी दिली आहे, तर शेतकऱ्यांच्या अर्जावर नेरळ पोलीस कोणती भूमिका घेतात याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

बालकामगार प्रथेविरोधात पनवेलमध्ये जनजागृती

। पनवेल । वार्ताहर ।

कामगार उपायुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या निर्देशानुसार रायगड जिल्ह्यात जागतिक बाल कामगार प्रथा विरोधी दिनाचे औचित्य साधून रविवारी पनवेलमध्ये जनजागृती अभियान राबविण्यात आले.

यावेळी कामगार उपायुक्त रायगडचे प्रदीप पवार, सहाय्यक कामगार उपायुक्त समीर चव्हाण, सखी मंच आणि सुरक्षा रक्षक मंडळाचे सचिन ओव्हाळ, ममता मंचच्या स्मिता काळे यांच्यासह अनेक मान्यवर आजच्या जनजागृती अभियानामध्ये सहभागी झाले होते. यावेळी बालमजुरी थांबवू या आणि उज्वल भारत घडवूया याबाबतचे फलक सुद्धा हाती घेऊन जनजागृती करण्यात आली आहे.

> आजच्या जागतिक बाल कामगार प्रथा विरोधी दिनाच्या औचित्याने जनजागृती करत असतो बालकामगारांना उज्वल भविष्यासाठी त्यांना काम न देता त्यांना शिक्षण द्यावे व देशाचे भविष्य उज्वल करावे व या अभियाना मध्ये सर्वांनी सहभाग घ्यावा.
> – प्रदीप पवार, रायगड कामगार उपायुक्त

पनवेलमध्ये दैनंदिन कोरोना रुग्ण शंभरच्या घरात

२९६ रुग्ण उपचाराधीन, मुखपट्टीचा वापर करण्याचे आवाहन

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यात करोना रुग्णांची संख्या वाढत असून उपचाराधीन रुग्णांची संख्या २९६ पार झाली आहे. असे असले तरी शहरात कोरोना नियमांचे पालन होताना दिसत नाही. पनवेल तालुक्यात एकाच दिवशी ९९ कोरोनाग्रस्त आढळले. यामध्ये पालिका क्षेत्रात ८२ तर ग्रामीण भागात १७ रुग्ण होते. तसेच तालुक्यातील एकूण कोरोनावर उपचार घेणाऱ्यांची संख्या पालिका क्षेत्रात २४८ तर ग्रामीण भागात ४८ वर पोहचली आहे. तालुक्यात २९६ कोरोनाग्रस्त उपचार घेत होते. यामध्ये घरून उपचार घेणाऱ्यांची संख्या मोठी आहे. गेल्या तेरा दिवसांत पालिका क्षेत्रात ३१३ तर ग्रामीण पनवेलमध्ये ८५ कोरोनाग्रस्त आढळले. तालुक्यात १३ दिवसात सुमारे चारशे रुग्ण वाढले आहेत.

गेल्या सात दिवसांत पनवेल शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रुग्णवाढ झाली आहे. रायगड जिल्ह्याच्या तुलनेत पनवेल तालुक्यात सर्वाधिक कोरोनारुग्ण आहेत. गेल्या १३ दिवसांत पनवेल तालुक्यात एकाही रुग्णाचा कोरोनाने मृत्यू झालेला नाही.

> मुखपट्टी लावणे सरकारने बंधनकारक केले नसले तरी नागरिकांनी स्वत:ची खबरदारी म्हणून सार्वजनिक ठिकाणी वावरताना मुखपट्टीचा जरूर वापर करावा. प्रशासनाने हर घर दस्तक मोहीम हाती घेतली असून लसीकरण सुरू केले आहे. ७० पथक लसीकरणाचे काम करीत आहेत. गेल्या चार दिवसांत चारशेहून अधिक जणांचे लसीकरण करण्यात आले.
> – डॉ. आनंद गोसावी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल पालिका

रॉकिंग बॉम्बे बेव्हरेजेसमध्ये भूमीपूत्रांना रोजगार द्या

प्रदूषण टाळले तरच स्थानिकांचा पाठिंबा

। खोपोली । वार्ताहर ।

खालापूर तालुक्यामध्ये छत्तीशी विभागातील उसरोली येथे मे रॉकिंग बॉम्बे बेव्हरेजेस प्रा.लि कारखान्यात भूमीपुत्रांना रोजगार देण्याबरोबरच प्रदूषण टाळले तरच कंपनीला पाठिंबा देण्याचा निर्धार स्थानिकांनी व्यक्त केला आहे.

कंपनीच्या उभारणीबाबत नुकतीच जनसुनावणी करण्यात आली. यावेळी नागरिकांनी प्रारंभी कंपनी अधिकाऱ्यांवर प्रश्नांचा भडिमार केला पण नंतर या बाबत प्रकल्प अधिकारी यांनी सविस्तर उत्तरे दिल्याने बहुसंख्य नागरिकांनी या कंपनीला पाठिंबा देत स्थानिकांना रोजगार द्या आणि प्रदुषण टाळा तर पांठिबा देत कारखान्याचे स्वागत केले.

खानाव ग्रुपग्राम पंचयतीच्या हाद्दीत उसरोली गावजवळ ईथेनॉल बनविणारा मे रॉकिंग बॉम्बे बेव्हरेजेस प्रा लि हा कारखाना येत असून या ठिकाणी दररोज २५० टन कोळसा यावर प्रक्रिया होणार आहे व एल पी डी आधारित डीस्टिलरी प्रोजेक्ट उभारण्यात येणार आहे. त्यामुळे या कारखान्यामुळे येथील परिसरात प्रदूषण होऊन नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागणार असल्याने या कारखान्याला विरोध दर्शविण्यासाठी नागरिकांनी सुरुवात केली.तरेसच येथील व्यवस्थापनाच्या विराधात तक्रारी असल्याने शासनाच्या आदेशानुसार उपजिल्हाधिकारी पद्मश्री बैनाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना व्यवस्थापन व स्थानिक नागरिक व परिसरातील लोकप्रतिनिधीच्या उपस्थितीत जन सुनावणी हर्षाली हॉटेल, मिरकुटवाडी येथे घेण्यात आली.

यावेळी खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी प्रदूषण मंडळाचे अधिकारी रायगड व्ही.व्ही.किल्लेदार यासह सर्व शासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिक आदिवासी बांधव उपस्थित होते. यावेळी प्रकल्प अधिकारी विवेक कोडीलकर यांनी कारखाना कसा असणार आहे यामध्ये काय व कशाप्रकारे उत्पादन होणार असून त्याचा नागरिकांना व परिसराला त्रास होणार की नाही

याबाबत माहिती देऊन पाणी, प्रदूषण तसेच नोकर भरती याबाबत सविस्तर माहिती दिली

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवसेना नेते भाई शिंदे यांनी नागरिकांच्या वतीने आक्रमक पणे मुद्दे मांडत असताना उसरोली भागत या जागेत ग्रीन झोन असताना या ठिकाणी घातक कंपनी येत आहे हे कसे,या भागात इको सेन्सेटीव्ह असताना हा प्रकल्प झाला तर प्रदूषणाचा त्रास होईल या भागात लोकांना त्रास होईल जनतेला अंधारात ठेवून हा प्रकल्प होत आहे हा भाग प्रदूषण मंडळाने लोकांना समजून सांगीतले नाही आज प्रदूषण नाही म्हणून सांगता उद्याचा प्रदूषण चे काय असा प्रश्न उपस्थितीत केला तर तर २५० टन कोळसा त्याच्यावर प्रक्रिया होणार आहे त्यामुळे प्रदूषणाने नागरिकांना आजारांनी सामोरे जावे लागेल ती जबाबदारी कंपनी घेईल का हा प्रश्न आहे सवाल उपस्थित केला.

यावर सविस्तरपणे प्रकल्प अधिकारी विवेक कोंडीलकर यांनी उत्तरे दिली. तर यावेळी तालुकाध्यक्ष संतोष विचारे, रोहित विचारे, उमेश गावंड, अशोक मराजगे, महेश पाटील, संकेत सिमकर, यासह अन्य नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले. जिल्हा परिषदेचे सदस्य राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष नरेश पाटील यांनीही कारखाना व्यवस्थापनाने व्यवस्थित माहिती द्यावी व नागरिकांमध्ये समज गैरसमज दूर करावे तर येथील नागरिकांच्या नोकर भरतीच्या माध्यमातून उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लावावा, तसेच येथील नागरिकांच्या आरोग्यात बाधा येणार नाही याची काळजी घेऊन शासनाच्या नियमांचे पालन करून कारखाना सुरू करावा. आम्ही सारेजण या येऊ घातलेल्या प्रकल्पाचे स्वागत करू असे मत मांडले.

यावेळी येथील सरपंच गौतम ओव्हाळ यांनी प्रथम नागरिक म्हणून अगदी मुद्देसूद प्रश्न विचारले तर बाजूच्या देवन्हावे सरपंच अंकित साखरे यांनी नवीन प्रकल्प आल्याने परिसराचा विकास होत असल्याचे सांगून ॲडल्याब इमॅजिकाचे उदाहरण दिले. हा प्रकल्प स्वागतार्ह आहे. तसेच सावरोलीचे ग्रामपंचायत सदस्य संतोष बैलमारे यांनी ही टाटा स्टीलच्या माध्यमातून विकासाला चालना मिळाली व नोकर भरतीमध्ये ही प्राधान्य मिळाल्याचे सांगितले. खानाव पंचायतीच्या सदस्या कामनी पाटील, भूषण पाटील, नारंगी चे उपसरपंच उद्धव देशमुख, अनंता घोंगे आदी तरुण वर्गाने या कारखान्याचे समर्थ करीत कारखान्याचे स्वागत करीत आहोत असे सांगितले.

केमिकल कारखाना नसून पेट्रोलमध्ये इथॉनिल उत्पादन करणारा कारखाना आहे. कारखान्यात कोळसा लागणार असला तरी तांदळाचा भूसा, पालापाचोळा प्रक्रीया करून वीजनिर्मिती केली जाणार आहे. कोणत्याही प्रकारचे प्रदुषण होणार नाही त्यासाठी दरवर्षी हजारो झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. कंपनीच्या उत्पन्नापैकी जवळपास १६ कोटी सीएसआर फंडातील निधी गावात शाळा, रस्ते, वीज आरोग्यासाठी खर्च करणार तसेच स्थानिकांना नोकर भरतीत प्राधान्य देणार असल्याची माहिती कंपनीचे व्यवस्थापकांची जनसुनावणीत ग्रामस्थांच्या प्रश्नांना उत्तरे देताना दिली आहे.

पाण्याच्या टाकीत पडलेल्या गाईला जीवनदान

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

पालीतील स्वामी समर्थ नगर येथील एका इमारतीच्या सिमेंटच्या कोरड्या पाण्याच्या टाकीत रविवारी (दि.१२) एक गाय पडली होती. टाकीत पडलेली गाय चार ते पाच तास आत अडकल्याने बाहेर पडण्यासाठी धडपडत होती. या गाईला येथील नगरसेवक व स्थानिक नागरिकांनी मोठ्या शर्थीने बाहेर काढून जीवदान दिले.

गाय टाकीत पडली आहे हे येथील रहिवाशी उपेक्षा राऊत यांनी पाहिले. त्यानंतर त्यांनी सामाजिक कार्यकर्ते सूरज शेळके यांना सांगितले. शेळके यांनी नगरसेवक विनायक जाधव, नगरसेवक सुधीर भालेराव यांना ही बाब सांगितल्यावर त्यांनी नगरसेवक सुलतान बेनसेकर व नगरसेवक सुधीर भालेराव यांच्यासमवेत आपली टीम घेऊन घटनास्थळी पोहचले. पाहिले तर अतिशय निमुळत्या जागेतून ही गाय

टाकीत पडली होती. त्यामुळे तिला बाहेर काढणे जिकरीचे व कठीण होते. जेसीबीच्या सहाय्याने टाकीचे काँक्रीट फोडण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र निमुळत्या जागेमुळे तो प्रयत्न अयशस्वी ठरला.

त्यानंतर कैलास नाडकर व किरण पालकर यांनी टाकीत उतरून गाईला रस्सीने बांधले. त्यांनी व नगरसेवक सुलतान बेनसेकर, मकबूल बेनसेकर, नगरसेवक, सुधीर भालेराव, नगरसेवक विनायक जाधव, विद्येश आचार्य, हेमंत सिलिमकर, मोरेश्वर कांबळे, गंगाधर पांडव, कल्पेश आंबेकर, गणेश भोईर, अभिजित पाटील, सावंत काका आदींसह उपस्थित नागरिकांनी या गाईला वर खेचुन सुखरूप बाहेर काढले. अशा प्रकारे या गाईला जीवदान मिळाले.

मुंबईत सुमारे ९७ टक्के खाटा रिक्त

मुंबई : मुंबईमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव वेगाने वाढत असून दैनंदिन रुग्णसंख्या जवळपास दोन हजारांवर गेली आहे. त्यामुळे चौथी लाट येणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे. दुसरीकडे रुग्णालयात दाखल होणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प असून शहरातील रुग्णालयात सुमारे ९७ टक्के खाटा रिक्त आहेत. मुंबईत मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून दैनंदिन रुग्णसंख्या झपाट्याने वाढत असूनही सध्या सुमारे ११ हजार १५९ खाटा उपलब्ध असून ३८९ रुग्ण रुग्णालयात दाखल आहेत. रुग्णालयातील सुमारे तीन टक्केच खाटांवर रुग्ण आहेत. बहुतांश नवीन रुग्ण लक्षणेविरहित किंवा त्यांना सौम्य लक्षणे आहेत.

दमदार पावसाने पेरण्यांना वेग

। मुरूड । वार्ताहर ।

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार सतत हुलकावणी देणाऱ्या मान्सूनने अखेर कोकणात शुक्रवारी हजेरी लावली असून, मुरूड तालुक्यातील यशवंतनगर पंचक्रोशीत शुक्रवारपासून रिमझिम रिमझिम बरसत ढगांच्या गडगडाटासह सुरुवात केली. रविवारी सकाळी एक तासभर दमदार पाऊस झाल्याने बळीराजा सुखावला. त्यामुळे बहुतांशी शेतकऱ्यांनी भात पेरणी सुरू केली आहे.

या पावसाने शुक्रवारी मुरुड तालुक्यातील संपूर्ण वीज प्रवाह १२ तासांहून अधिक काळ खंडित झाल्याने बत्ती गुल झाली. त्यामुळे नागरिकांना रात्रभर झोप न मिळाल्याने ते पुरते हैराण झाले होते. खंडित वीजेमुळे येथील अनेक गावांतील पाणी पुरवठा करणारे पंप न चालल्याने तिन दिवस पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती.

मुरुड तालुक्याला पाभरे येथून वीज पुरवठा होत असून पाभरे नजिकच्या मुख्य वीज वाहिनीवर शुक्रवारी झाड पडल्याने उच्च दाब वीज वाहिनी तुटून मुरुड तालुक्याचा वीज पुरवठा खंडित झाला होता. सदर वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून तब्बल १२ तासानंतर मुरुडचा वीज पुरवठा सुरळीत केला. तरीही स्थानिक परिसरात काही तांत्रिक दोषांमुळे वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. त्याचा फटका छोट्या मोठ्या व्यावसायिक, दुकानदारांना होत आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

पनवेलमध्ये विविध मान्यवरांचा पुरस्काराने सन्मान

। रसायनी । वार्ताहर ।

पत्रकार उत्कर्ष समिती, महाराष्ट्र राज्य अंतर्गत स्थापित महिला उत्कर्ष समिती राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा रविवारी १२ रोजी पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके सभागृहात पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री अदिती तटकरे, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने माध्यमिक व उच्च माध्यमिक

शिक्षण मंडळाचे निवृत्त सचिव व्हि. एस.म्हात्रे, मराठी इंडियन आयडॉल सागर म्हात्रे, अभिनेत्री अनघा कडू, महिला व बालकल्याण माजी सभापती उमाताई मुंढे, समाजसेवक सुनील कोटीयन आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन श्रीगणेश पुजनाने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी वादळवाराचे संपादक विजय कडू यांना जिवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. तर आदर्श पत्रकार म्हणून दै. संध्याकाळच्या संपादिका रोहीणी खांडीलकर, दै.दबंग दुनियाचे संपादक उन्मेश गुजराती तर समाजरत्न विवेक मोकल, शशिकला गुंजाळ, वैद्यकरत्न डॉ मनोज नागरगोजे, डॉ सतिश मांढरे, पंचज्योती सन्मानात प्रेरणा गावकर (दुसरी सिंधुताई), सिमा पाटील (महिला शाहिर), शिल्पा आठल्ये (शास्त्रीय गायिका), प्रमिला पवार (शिक्षणातून समाजजागृती), सलोनी मोरे (खेळाडू) तसेच मराठी इंडियन आयडॉल म्हणून सागर म्हात्रे, महत्वाचा समजला जाणारा इलेक्ट्रॉनिक मिडियाचा पुरस्कार झी २४ तासचे प्रतिनिधी प्रफुल्ल पवार, टि.व्ही.९ चे प्रतिनिधी लक्ष्मीकांत घोणसे पाटील यांना पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१०२०६

निवडणूक विभाग
पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२२
सहपत्र-१
जाहिर सूचना

पनवेल महानगरपालिकेच्या सन २०२२ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्ध करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहिर करण्यात येत आहे.

१	प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धीची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा दिनांक	सोमवार, दि.१३ जून २०२२
२	हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे, निवडणूक कार्यालय मुख्यालय येथे सादर कराव्यात.)	सोमवार, दि. १३ जून २०२२ ते शुक्रवार दि. २४ जून २०२२ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत)

टिप :- हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

प्रारुप प्रभाग रचना नकाशे, अधिसूचना व प्रभागाच्या व्याप्ती/चतुःसीमा या महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ www.panvelcorporation.com वर तसेच खालील कार्यालयामध्ये उपलब्ध असतील.
१. पनवेल महानगरपालिका, मुख्यालय,
२. प्रभाग समिती-अ, खारघर, पनवेल महानगरपालिका
३. प्रभाग समिती-ब, कळंबोली, पनवेल महानगरपालिका
४. प्रभाग समिती- क, कामोठे, पनवेल महानगरपालिका
५. प्रभाग समिती- ड, पनवेल महानगरपालिका
ठिकाण : पनवेल महानगरपालिका, पनवेल
दिनांक : १३/०६/२०२२
पमपा/निवडणुक/जा.क्र.००२३/२०२२
दिनांक : १०/०६/२०२२

सही/-
(गणेश देशमुख)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

नारंगीमध्ये घरोघरी छत्रीवाटप

। पाताळगंगा । वार्ताहर ।

कै. हरेश मोटवाणी यांच्या स्मरणार्थ एच.पी.अँडेशीव कंपनीच्या डायरेक्टर अंजना हरेश मोटवाणी यांच्या वतीने नारंगी हद्दीतील गावामध्ये घरोघरी जाऊन मोफत छत्री वाटप करण्यात आले.

नारंगी गाव, नारंगी आदिवासी वाडी, दत्तवाडी नारंगी, नारंगी नविन वसाहत, नारंगी बौध्दवाडा या

गावांमध्ये या छत्र्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी कंपनीचे डायरेक्टर निधी मोटवाणी, विनय राणे, देवेंद्र देशमुख, दिलीप देशमुख, राहूल देशमुख, मिलिंद गायकवाड, अनंता वाघुले, मंगेश देशमुख, समिधा कोंडे, अभिजित पालकर, हौसा अरावकर आदी उपस्थित होते.

मनसेचे जे.पी.पाटील पोहचले अयोध्येत

। खोपोली । वार्ताहर ।

मनसेचे रायगड जिल्हा सचिव जे.पी.पाटील या ढाण्या वाघाने भाजपाचे खा.बृजभूषण सिंहचा आव्हान स्वीकारत स्वीकारत मनसेचे झेंडा अयोध्येत फडकावत रामलल्लाचं दर्शन घेतले. रामलल्लाचं दर्शन घेत पूजाअर्चा व शरयू नदीमध्ये स्नान करीत मनसेचा जयजयकार केला. आयोध्दा स्थानिक गाडीवाला रवि राठोड याने सहकार्य केले असल्याचे आभार

जे.पी.पाटील यांनी मानले.

'माथेरानमधील रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करा'

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमधील रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण केली जावीत, अन्यथा पावसाळ्यात या रस्त्यांना गटाराचे स्वरुप आल्याशिवाय राहणार नाही, अशी भीती नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

जोपर्यंत मुख्य रस्त्याच्या खालून गेलेल्या ड्रेनेज लाईनची कामे पूर्ण केली जात नाहीत तोपर्यंत रस्त्यांची कामे सुरू करू नयेत. त्याप्रमाणे टपाल पेटी नाका इथपर्यंत ब्लॉक लावण्याची कामे पूर्ण झाली आहेत.

पुढील संपूर्ण भागात दुकानदार त्याचप्रमाणे रेस्टॉरंट, हॉटेल्स यांच्या ड्रेनेज लाईन गेलेल्या आहेत भविष्यात या ड्रेनेज लाईनची कामे करताना एवढया मोठ्या प्रमाणावर रस्त्यांसाठी खर्च केला जात असल्यामुळे पुन्हा रस्त्यांची खोदाई करताना वाताहत होउ शकते यासाठी माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी आमदारांना निवेदन दिले होते.

त्यामध्ये त्यांनी टपाल पेटी नाका ते लक्ष्मी हॉटेल पर्यंत ड्रेनेज लाईनच्या कामाची आवश्यकता आहे असे नमूद केले होते आणि त्यावर ताबडतोब आमदार थोरवे यांनी एमएमआरडीए

ला आदेश सुध्दा दिले होते.

नुकताच पावसाळा सुरू झाला असून पावसाळी पाण्याने काही ठिकाणी मुख्य रस्त्याची गटारे झाली आहेत. त्यामुळे याचा सर्वांना त्रास सहन करावा लागत आहे.

याकामी संबंधित अधिकारी वर्गाने ज्या ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईनची कामे पूर्ण झाली आहेत. त्याठिकाणी क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांची कामे जलदगतीने पूर्ण करण्यासाठी एमएमआरडीएच्या ठेकेदारांना सूचित करावे, अशी स्थानिकांमधून मागणी केली जात आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी, अलिबाग नगरपरिषदेचे हद्दीमधील, श्रीबाग नंबर २ येथील, ओम प्रथमेश को-ऑप हाऊसिंग सोसायटी या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील, निवासी गाळा क्रमांक २०२ हा २० चौरस मीटर क्षेत्राचा निवासी गाळा श्रीमती शुभांगी चंद्रकांत शिगम यांचे खुद्द मालकीचा आहे. सदर निवासी गाळ्याला, अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक झेड. १ ए.एस.बी. २००२७८४ असा क्रमांक नगरपरिषदेने दिला आहे. सदर निवासी गाळा विकत घेण्याबाबत आमचे अशिलांची श्रीमती शिगम यांचेबरोबर बोलणी चालू आहेत. सदर व्यवहार अंतिमतः ठरविण्यापूर्वी वर नमूद मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची/वित्तसंस्थेची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरीता ही नोटीस देण्यात येत आहे.

तरी, सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसात नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : ११/०६/२०२२

सही/-
ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग, रायगड

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना
(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना सदर भूखंडाचे वाटपपत्र/करारनामा करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना सदर भूखंडाचे वाटपपत्र करण्याचे प्रस्तावित आहे.

अ. क्र.	गाव व संचिका क्र.	निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र	मंजूर पात्रता	वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती
१	करंजाडे (संचिका क्र. ३४६)	७९	८/२ १२९/१	०-३३-४ ०-८९-५	११०० चौ.मी.	मौजे-करंजाडे नोड, भूखंड क्र. ३५, सेक्टर-४, क्षेत्र-१०९६.५२ चौ.मी.	**भूधारक कै. पार्वतीबाई चांगु हुदार (मयत) यांचे वारस** १) विष्णू चांगु हुदार २) शंकर चांगु हुदार ३) रामूबाई उर्फ चंद्रभागा भगवान हुदार ४) शोभा भगवान हुदार उर्फ शोभा भालचंद्र मुणे ५) ज्ञानेश्वर भगवान हुदार ६) हिराबाई चांगु हुदार उर्फ निर्मला बाळाराम म्हात्रे ७) जयाबाई चांगु हुदार उर्फ सुनिता विश्वनाथ म्हसकर ८) नागू घारु हुदार	
	एकूण संपादित क्षेत्र			१-२२-९				

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)
सिडको/जनसंपर्क/१०६/२०२२-२३

क्लिक प्रवाशांची कोरोना चाचणी

पनवेल रेल्वे स्थानकात बाहेरून येत असलेल्या प्रवाशांची चाचणी करण्यात येत आहे. दिवसाला २०० हून अधिक व्यक्तींची चाचणी करण्यात येत आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

शारलोट तलावात पाणीसाठा वाढणार

तलावातील गाळ काढण्यास सुरूवात

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानच्या शारलोट तलावाची एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून ओळख आहे. मात्र हा तलाव माथेरानची जीवनवहिनी सुद्धा आहे. यातील जलसाठा हा माथेरानमधील नागरिकांसह पर्यटकांना पिण्यासाठी वापरला जातो. पण गेली सात वर्षे या तलावातील गाळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून काढून तो स्वच्छ केला नाही. त्यामुळे या तलावात पाणी कमी आणि गाळ जास्त अशी स्थिती झाली होती. एमजेपीने या तलावातील गाळ स्वच्छ करण्याबाबत एमजेपीने निधी मिळत नसल्याचे कारण पुढे करत आपली उदासीनता दाखवत हात वर केले. परिणामी पाणी टंचाईच संकट माथेरानकरांवर ओढू नये यासाठी नगरपालिकेने पुढाकार घेत या शारलोट तलावाची स्वच्छता सुरू केली आहे.

माथेरान हे गिरीशिखरावरील पर्यटनस्थळ असल्याने साहजिकच जोरदार पाऊस येथे पडतो. त्यामुळे सखल भागात हा तलाव असल्याने तीन दिशातून पाणी या तलावात येते. वाहते पाणी असल्यामुळे गाळ सुद्धा मोठ्या प्रमाणात येतो. पण हा गाळ

गेली सात वर्षे काढला नसल्याने गाळाचे प्रमाण वाढले असून पाणी कमी साठत आहे. यासाठी हा गाळ काढणे अति महत्वाचे होते. नगरपालिकेने याचे गांभीर्य लक्षात घेऊन जोरदार पाऊस पडण्यागोदर तलावातील गाळ काढण्यास सुरुवात केली आहे.

माथेरानमध्ये या तलावातील पाणी फिल्टर करून याचा पिण्यासाठी उपयोग होतो. त्यामुळे हा तलाव स्वच्छ करणे महत्वाचे आहे.य ाचा सारासार विचार करत नगरपालिकेतील माजी बांधकाम सभापती यांनी तलाव स्वच्छ करण्यासंदर्भात मुख्याधिकारी सुरेखा भणगे-शिंदे यांना पत्र लिहून गाळ काढण्याची विनंती केली होती. तसेच नगराध्यक्षा प्रेरणा सावंत व त्यांच्या सदस्यांनी यांनी ठराव ही पारित केला होता. ६ लाख ६६ हजार २२ रुपये अंदाजपत्रकिय किंमत ही करून जुलै २१ मध्ये या कामाची तांत्रिक मान्यता ही आणली होती. त्यानुसार मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी निविदा प्रसिद्ध करून या कामाला सुरुवात देखील केली आहे. ठेकेदारामार्फत हे काम युद्धपातळीवर सुरू आहे आणि याच्यावर देखरेख स्वतः मुख्याधिकारी ठेवत आहेत.

> शारलोट तलावाचे गाळ काढणे आणि स्वच्छता करणे हे काम नगरपालिकेने युद्धपातळीवर सुरू केले आहे. १८५७ मध्ये बांधलेला शारलोट तलाव हा ब्रिटिशकालीन असून काही ठिकाणी फक्त दगडापासून बांधलेल्या भिंती पडल्या होत्या त्या भिंती बनविण्यात येत आहेत. तसेच तलावातील गाळ जास्त असल्याने ते काढण्याचे काम सुरू आहे. यावर मी स्वतः देखरेख ठेवत आहे. लवकरच जेसीबीला परवानगी मिळाली तर एक महिन्यात या तलावातील गाळ काढून स्वच्छ केला जाईल व काढलेला गाळ हा वृक्ष संवर्धनासाठी वापरला जाईल.
> – सुरेखा भणगे-शिंदे, मुख्याधिकारी तथा प्रशासक

महत्त्वाचे

गोखले महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल

श्रीवर्धन : गोखले एज्युकेशन सोसायटीच्या श्रीवर्धन येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा टी.वाय.बी. कॉम.आणि टी.वाय बी.एस. सी. या वर्गांचा निकाल शंभर टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेतून प्रथम मरियम मसूद खान, तर विज्ञान शाखेतून प्रथम खालीद इब्राहिम दाभिलकर यांचे प्राचार्य डॉ.श्रीनिवास जोशी, डॉ.कल्याणी नाझरे, प्रा.राजू गोरुले, प्रा.वाल्मिक जोंधळे, प्रा.पंकज गमे, प्रा.निलेश चव्हाण आदींनी कौतुक केले.

झिराड येथे 'स्कूल चलो' अभियान

। सोगाव । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील झिराड येथील आदिवासीवाडी व भोईर आळी येथे दी लाईफ फाऊंडेशनतर्फे स्कूल चलो अभियानांतर्गत प्रभातफेरीचे आयोजन केले होते. सर्व मुले-मुली शाळेत जावीत आणि त्यांच्या पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजावे हा प्रभातफेरी मागचा उद्देश आहे.

या कार्यक्रमाला रा.जि.प.समाजकल्याण सभापती दिलीप भोईर यांनी आवर्जून उपस्थिती दर्शवली होती. तर त्यांच्यासोबत रायगड जिल्हा परिषद उच्च माध्यमिक झिराड शाळेचे शिक्षक उमेश ठाकूर, प्रियांका म्हात्रे, सुचिता शास्त्री, अंगणवाडी सेविका व मदतनीस तसेच दी लाईफ फाउंडेशनचे प्रकल्प समन्वयक शिलानंद इंगळे, सोशल वर्कर माधुरी जगताप, राखी राणे आदी यांच्या उपस्थितीत ही प्रभात फेरी काढण्यात आली. यावेळी रायगड जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी या प्रभातफेरीत सहभाग नोंदवून आपली उत्सुकता दर्शविली.

मुलीसोबत लग्न; गुन्हा दाखल

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

१४ वर्षीय मुलीसोबत बेकायदेशीर लग्न करून, तिला गर्भवती केल्याप्रकरणी आरोपी अमोल मनोज पवार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेलमध्ये १४ वर्षे दहा महिने वयोगटातील पीडित मुलगी ही अल्पवयीन असल्याचे माहीत असतानाही तिच्यासोबत अमोल पवार याने बेकायदेशीर लग्न केले व तिला गर्भवती केले. याप्रकरणी कामोठे येथील डॉक्टरांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात आरोपीविरूद्ध बलात्कारासह पॉक्सोअंतर्गमत गुन्हा दाखल केला आहे.

वटपौर्णिमेसाठी बाजारात परड्या दाखल

। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।

मंगळवारी वटपौर्णिमा असल्याने सुहासिनींना वडाच्या पूजेकरीता लागणाऱ्या बांबू वेताच्या परड्यांची घरोघरी विक्री केली जात आहे. सत्तर ते शंभर रुपयांस एक परडी या दराने ही विक्री केली जात आहे.

नवीन लग्न झालेल्या मुली नटूनथटून निरनिराळी फळे, फणसाचे गरे, पूजेचे साहित्य परड्यांतून घेऊन गावच्या वेशीवरील वडाच्या झाडाला दोरा गुंडाळून पूजाअर्चा करतात. एकमेकीला वाण देतात व दिवसभर उपवास करतात. मुरुड तालुक्यातील ग्रामीण भागात वटपौर्णिमेच्या दिवशी हे दृश्य आजच्या मोबाईल युगातही दिसून येते. त्यामुळे वटपौर्णिमेच्या दोन-चार दिवसांपासूनच ग्रामीण भागातील बाजारपेठेत फळे, फुले व अन्य साहित्याची विक्री करून चार पैसे मिळवण्याच्या आदिवासी व अन्य गोरगरीब महिला येथे दिसून येतात. मुरूड शहर बाजार पेठेत देखील वटपौर्णिमेसाठी लागणारे फणस, पोत बांगडी, विविध

प्रकारातील फळे मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आलेली दिसून येत आहेत.

खचलेल्या रस्त्यावर पुन्हा खड्डा

। उरण । वार्ताहर ।

जेएनपीटी मार्गावरील खचलेल्या रस्त्याच्या जागी कोस्टल रोडच्या सुरुवातीलाच मोठा खड्डा पडला असून मृत्यूचा सापळा निर्माण झाला आहे. याकडे मात्र नॅशनल हायवे अथोरिटीचे दूर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. मात्र यामुळे अपघात झाल्यास जबाबदार कोण असा सवाल प्रवाशी नागरीकांमधून विचारला जात आहे.

उड्डाण पुलाच्या खालून कोस्टल रोडकडे आणि कोस्टल रोडकडून जेएनपीटी हायवेकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडच्या रस्त्यावरील काँक्रीट रस्त्याच्या बाजूला मोठा खड्डा निर्माण झाला आहे. सदर खड्ड्याकडे दुर्लक्ष केले तर पावसाळ्यात मोठा खड्डा पडून रात्री अपरात्री अपघात होण्याची संभवना नाकारता येत नाही. तरी नॅशनल अथोरीटीने सदर रस्त्याच्या खड्ड्याकडे, रस्त्याच्या साईट पट्ट्यांकडे लक्ष केंद्रित करून पूर्ववत करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

कुणबी समाजाची पुनर्बांधणी करणार

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

कुणबी समजोन्नोती संघ मुबंई ग्रामीण शाखा रोहा तालुका स्तरावर जुन्या चाली रूढी परंपरा जोपासणारे एकमेव चणेरा विभाग कुणबी समाज आहे त्याचा आदर्श इतर विभागीय कुणबी समाज ग्रुपने घेतला पाहिजे याकरिता पुन्हा कुणबी समाज ग्रुपची पुनर्बांधणी करणार असल्याचे प्रतिपादन रोहा तालुका कुणबी समाजाचे अध्यक्ष शिवराम शिंदे यांनी केले. कुणबी समजोन्नोती संघ मुबंई ग्रामीण शाखा रोहाची सभा कुणबी समाज नेते माजी.आ.पा.रा.सानप कुणबी भवन रोहा येथे आयोजित केली होती.

कर्जतमध्ये मोफत पाठ्यपुस्तके वाटप

। माथेरान । वार्ताहर ।

समग्र शिक्षा अभियानातंर्गत मोफत पाठ्यपुस्तके योजने अंतर्गत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी कर्जत गटातील मराठी, उर्दू आणि सेमी इंग्रजी या माध्यमाकरिता रायगड जिल्हा परिषद यांसकडून मोफत पाठ्यपुस्तके उपलब्ध झाली आहेत. त्या पुस्तकांचे वाटप कर्जत तालुक्यातील कन्या शाळेमध्ये येथील विविध शाळांना वाटप करण्यात आले.

इयत्ता पहिली ते आठवी या वर्गातील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचा लाभ मिळणार आहे. मागील दोन वर्षे कोरोना

काळामध्ये शालेय पाठ्यपुस्तके वितरित होऊ शकली नाहीत. मात्र यावेळेस अगदी नियोजनबद्ध पद्धतीने रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पुस्तके उपलब्ध करण्यात आली आहेत. या पुस्तकांचे वितरण कर्जत येथे असलेल्या कन्या शाळेमध्ये गटशिक्षणाधिकारी सुरेखा हिरवे यांच्या मार्गदर्शनाखाली व पाठ्यपुस्तक समन्वयक मालू गायकवाड, नविद हाश्मी, राम एनकर, सुनील राणे यांच्या हस्ते एकूण ३२४ शाळा व केंद्रनिहाय पाठ्यपुस्तके केंद्र प्रमुख यांना वाटप करण्यात आले.

> कर्जत तालुक्यातील समग्र शिक्षण अभियानातंर्गत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली. यामध्ये जिल्हा परिषद, नगरपरिषद, शासकीय, आश्रम शाळा व खाजगी अनुदानित अशा सर्व मिळून एकूण ३२४ शाळांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली आहेत.
> – सुरेखा हिरवे, गटशिक्षणाधिकारी

तसेच समावेशीत शिक्षण अंतर्गत दिव्यांग अथवा अंध असणाऱ्या विद्यार्थ्यांना लार्ज प्रिंट पाठ्यपुस्तके पंचायत समितीचे गट शिक्षण अधिकारी सुरेखा हिरवे समावेशीत शिक्षण विशेष तज्ञ नविद हाश्मी आय.ई.डी.टीमच्या प्रतीक्षा तायडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

ब्रह्मचैतन्य संगीत सभेत अजय रिसबूड यांचे गायन

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल येथील 'सूर निरागस हो' या संगीतप्रमी समूहाच्या वतीने आयोजित ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे सातवे पुष्प संपन्न झाले. गोंदवलेकर महाराज साधना केंद्रामधे संपन्न झाले. या संगीतसभेमधे मुलुंड येथील प्रसिद्ध शास्त्रीय गायक अजय रिसबूड यांचे गायन संपन्न झाले.

पं.अरुण कशाळकर यांचे शिष्य असलेल्या अजय रिसबूड यांनी मैफिलीची सुरवात आग्रा घराणेची खासियत म्हणजे नोमतोम या सादरीकरणाने केली. त्यानंतर राग केदार रागातील एक बंदिश पेश केली. नंतर स्वतः संगीतबद्ध केलेला विठ्ठलभक्तीपर अभंग आणि वाजे वृंदावनी वेणू व आम्हा न कळे ज्ञान या रचना सादर केल्या. त्यांना अथर्व देव यांनी संवादिनी, गणेश घाणेकर यांनी तबला, विशाल जोगळेकर यानी पखवाज व समीर सोमण यानी तालवाद्यांची साथ केली.

कॅन्सरग्रस्तांना पालिकेचा आधार

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागातर्फे कॅन्सर या दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या महिला, मुला-मुलींना २५ हजार रूपयांचे अर्थसहाय्य करण्यात येणार आहे. याबाबत महिला बालकल्याण विभागाकडे अर्ज करण्याचे आवाहन सभापती हर्षदा उपाध्याय यांनी केले आहे. योजनेचे अर्ज महिला व बालकल्याण विभागात उपलब्ध असून गरजू लाभार्थ्यांनी सदर अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आजाराचे निदान झालेल्या रूग्णास सदर लाभ दिला जाईल.

शालेय मुलींना सायकलचे वाटप

। खरोशी । वार्ताहर ।

सामाजिक कार्यात नेहमी पुढे राहून समाजाप्रती मेहनत घेऊन काम करणाऱ्या अहिल्या महिला मंडळ पेण यांच्या विशेष प्रयत्नाने सांगवड येथे १६ मुलींना सायकल वाटप करण्यात आले.

शाळेत जाण्यासाठी मुलींना ६ किलोमीटर चालत जावे लागत असे, ऊन व पावसात अतिशय कष्ट घ्यावे लागायचे. गेली ४० वर्ष याच पद्धतीने किमान दोन-तीन पिढ्या या त्रासातून गेल्या येथील शालेय मुलींना लवकर पोहचता यावे यासाठी अहिल्या महिला मंडळ उपाध्यक्षा सुलभा सुर्यवंशी यांनी पुढाकार घेऊन थोडा मदतीचा हात देण्याचे ठरविले. मुलींची शाळेसाठी होणारी पायपीट थांबविण्यात हे सहाय्य उपयोगी ठरणार असल्याने सायकल मिळताच मुलींच्या चेहऱ्यावरील आनंद गगनात मावेनासा पहायला मिळाला. हे मंडळ सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक व लोकोपयोगी कार्यात सदैव पुढे असतात.

अदानी प्रकल्पामुळे श्रीलंकेत पुन्हा एकदा वाद

वर्षा मेहता

। अलिबाग ।

श्रीलंकेतील अदानी प्रकल्प पुन्हा वादाच्या केंद्रस्थानी आहे, कारण सिलोन विद्युत मंडळाच्या (सीईबी) एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने संसदीय पॅनेलला सांगितले की, बेटाच्या उत्तरी मन्नार जिल्ह्यातील एक अक्षय ऊर्जा प्रकल्प अदानी समूहाला देण्यात आला आहे. मंत्री नरेंद्र मोदी यांनी अध्यक्ष गोटाबाया राजपक्षे यांच्यावर दबाव केला.

सीईबीचे अध्यक्ष एम.एम.सी. फर्डिनांडो यांनी शुक्रवारी सार्वजनिक उपक्रम समितीसमोर (सीओपीई) टिप्पणी केली, परंतु लवकरच ते भावनिक असल्याचे सांगून ते मागे घेतले. शुक्रवारी त्यांचे विधान आणि त्वरीत माघार या दरम्यान श्री गोटाबाया यांनी शनिवारी केलेले ट्विट होते: मन्नारमधील पवन ऊर्जा प्रकल्पाच्या पुरस्काराबाबत COPE समितीच्या सुनावणीत Ika CEB चेअरमन यांनी केलेल्या विधानाचा आदर करा, हा प्रकल्प कोणत्याही विशिष्ट व्यक्ती किंवा संस्थेला देण्याचे अधिकार मी स्पष्टपणे नाकारतो. मला विश्वास आहे की या संदर्भात जबाबदारीने संवाद साधला जाईल.

सोशल मीडियावर जोरदार चर्चा

ऊर्जा प्रकल्पांसाठी स्पर्धात्मक बोली प्रभावीपणे काढून टाकून श्रीलंकेने वीज कायद्यात सुधारणा केल्यानंतर काही दिवसांनी हा विकास झाला. या निर्णयावर विरोधी पक्ष आणि सरकारवर टीकास्त्र सोडले. विधेयकावरील संसदीय चर्चेत, त्यानंतर मंजूर झालेल्या, विरोधी पक्षाचे खासदार नलिन बंडारा यांनी चिंता व्यक्त केली की अदानी समूहाच्या प्रकल्पांसाठी मार्ग काढण्यासाठी स्पर्धात्मक बोली लावली जात आहे.

पाणथळ क्षेत्रातील डेब्रिज हटविण्यास सुरूवात

पर्यावरणप्रेमींच्या तक्रारीनंतर महापालिकेची कार्यवाही

। नवी मुंबई । वार्ताहर ।

पाणथळ क्षेत्रात बेकायदेशीररीत्या डेब्रिजची विल्हेवाट लावली जात आहे. त्यामुळे पावसाळ्यात पुराचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणप्रेमींनी केलेल्या तक्रारींची दखल घेऊन महापालिकेने वाशी सेक्टर ९ येथे एका बांधकाम व्यावसायिकाने टाकलेले डेब्रिज हटविले आहे.

नवी मुंबईत विकास प्रकल्पांच्या नावाखाली बेसुमार वृक्षतोड प्रस्तावित केली आहे. तर काही ठिकाणी छुप्या पद्धतीने झाडांची कत्तल सुरूच आहे. त्याचबरोबर स्थलांतरीत पक्ष्यांचे आश्रयस्थान असलेल्या पाणथळ क्षेत्रांवर विविध मार्गांनी गंडांतर आणले जात आहे. काही ठिकाणी डेब्रिजचे ढीग टाकून पाणथळ क्षेत्राची व्याप्ती कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नेरूळ येथील एनआरआय आणि टीएस चाणक्य पाणथळ क्षेत्रात मागील काही दिवसांपासून बांधकामातून तयार होणाऱ्या डेब्रिजची विल्हेवाट लावली जात आहे, तर वाशी सेक्टर ९ येथे मोठ्या प्रमाणात डेब्रिज टाकले आहे. डेब्रिजच्या ढिगाऱ्यांमुळे पावसाळ्यात पाणी तुंबून पूरसदृश स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नॅट कनेक्ट फाऊंडेशन संस्थेचे संचालक बी.एन.कुमार यांनी यासंदर्भात महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांना पत्र लिहून पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या डेब्रिज माफियांवर कारवाईची मागणी केली होती. त्यामुळे आयुक्त बांगर यांच्या सूचनेनुसार संबंधित विभागाने खाडीकिनारे आणि पाणथळ क्षेत्रात टाकलेले डेब्रिज हटविण्याची कार्यवाही सुरू केली आहे. दरम्यान बेकायदेशीरपणे डेब्रिज टाकणाऱ्या विकासक, कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करून कारवाई करावी अशी मागणी हरितप्रेमींनी केली आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)